# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## साताऱ्याच्या कोयना-कृष्णा अन् वेण्णा नद्यांचा रौद्रावतार; मुंबईतही जोर‘धार’

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- राज्यातील बहुतांश जिल्ह्यात मुसळधार पावसाने अक्षरशः झोडपून काढलं आहे. सध्या जरी पावसाने राज्यातील काही भागात उसंत घेतली असली तर पावसाच्या विश्रांतीनंतर पाऊस आणि पुराच्या पाण्याने केलेल्या नुकसानाची दाहकता समोर आली आहे. अशातच पश्चिम महाराष्र्टात देखील पावसाचा जोर बघायला मिळत आहे. सातारा जिल्ह्याच्या घाटमाथ्यावर आज येलो अलर्ट देण्यात आला आहे. परिणामी सततच्या पावसामुळे आणि धरणांमधून सुरू असलेल्या विसर्गामुळे कृष्णा, कोयना आणि वेण्णा नद्या दुतडी भरून वाहत आहेत. साताऱ्यातील संगम माहुली परिसरातील छत्रपती शाहू महाराज यांची समाधीला पाण्याने वेडा घातला आहे. तर तिकडे मुंबईच्या पश्चिम उपनगरात देखील पावसाने हजेरी लावली आहे. हवामान विभागाने आज मुंबई, ठाणे, रायगड आणि पुणे जिल्ह्यातील घाट क्षेत्राला यलो अलर्ट दिला असून काही ठिकाणी ३०-४० किमी प्रतितास वेगाच्या सोसाट्याच्या वाऱ्यांसह मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. दरम्यान, साताऱ्याची भाग्यलक्ष्मी असलेल्या कोयना धरणातील पाणीसाठा ९१.४२ टीएमसीवर पोहोचला आहे. पाणीपातळी नियंत्रित करण्यासाठी धरणाचे सहा वक्र दरवाजे पाच फुटांपर्यंत खाली आणून एकूण ३० हजार २२३ क्युसेक पाण्याचा विसर्ग कोयना नदीपात्रात केला जाणार आहे.


(वर्ष ६५ वे अंक १९७) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मंगळवार, दि.०४ ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# कठोर कारवाई करणाऱ्या जवानांना संरक्षण देऊ नका-सर्वोच्च न्यायालय

### विद्यार्थ्यांवर गुन्हा दाखल होणार नाही, २७०० गुन्हेगारांविरुद्धचा एफआयआर कायम राहील; केंद्र सरकारची भूमिका

नवी दिल्ली दि.३ (वृत्तसंस्था)- नीट पेपरफुटीचा निषेध करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कोणतीही कायदेशीर कारवाई केली जाणार नाही, अशी माहिती केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला दिली आहे. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सोमवारी सांगितले, ’सरकार आपल्या वचनावर ठाम आहे. विद्यार्थ्यांविरुद्ध कोणतेही एफआयआर दाखल केले जाणार नाहीत.’ मेहता यांनी असेही सांगितले की, आंदोलनादरम्यान गंभीर गुन्ह्यांसाठी २,७०० हून अधिक लोकांविरुद्ध दाखल केलेले एफआयआर मागे घेतले जाणार नाहीत. या मुद्द्यावरून कॉकरोच जनता पार्टीने (सीजेपी) दिल्लीतील जंतर मंतर येथे आंदोलन केले. सरकारने आंदोलकांविरुद्ध कोणतीही कायदेशीर कारवाई न करण्याच्या मागणीसह तीन मागण्या मान्य केल्या. या प्रकरणाची सुनावणी आता १८ ऑगस्ट रोजी होणार आहे.

२० जुलै रोजीच्या संसद मोर्चादरम्यान झालेल्या पोलीस अत्याचारांच्या आरोपांच्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाने आज सुनावणी घेतली. आंदोलकांविरुद्ध दाखल केलेले एफआयआर मागे घेतले जातील किंवा रद्द केले जातील का, असा प्रश्न वकील वृंदा ग्रोव्हर यांनी विचारला. मेहता यांनी उत्तर दिले की, सरकार कायदेशीरदृष्ट्या योग्य असलेल्या सर्व मार्गांचा वापर करून आपल्या वचनावर ठाम आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले की, जर एखाद्या पोलीस अधिकाऱ्याने अतिरिक्त बळाचा वापर केला, तर त्याला किंवा तिला विनाकारण संरक्षण दिले जाऊ नये. तसेच, विद्यार्थी आंदोलनाच्या नावाखाली एका कुख्यात गुन्हेगाराला संरक्षण दिले जाऊ नये.

परीक्षेतील अनियमितता आणि नीट पेपरफुटीविरोधात ’कॉकरोच जनता पार्टी’चे आंदोलन ३६ दिवस चालले. २५ जुलै रोजी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर हे आंदोलन संपवण्यात आले. आंदोलकांच्या आरोपांची आणि पेलेट गनमुळे झालेल्या जखमांची चौकशी करण्यासाठी खंडपीठ सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष तपास पथक स्थापन करू शकते. पोलिसांवरील हल्ले विद्यार्थ्यांनी केले होते की विद्यार्थ्यांच्या जमावात घुसलेल्या समाजकंटकांनी, हे निश्चित करण्याचा प्रयत्नही न्यायालय करू शकते.

# नितीन गडकरींच्या निवासस्थानावर जनआक्रोश मोर्चा, राजीनाम्याची आग्रही मागणी

## ई-२० इंधनाविरोधात नागपुरात युवक काँग्रेसचे कार्यकर्ते आक्रमक

नागपूर दि.३ (प्रतिनिधी)- केंद्र सरकारच्या विरोधात नागपुरात युवक काँग्रेसचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहे. ई-२० पेट्रोलविरोधात काँग्रेस आक्रमक झाली असून केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या नागपुरतील घराबाहेर युवक काँग्रेसने जनआक्रोश आंदोलन केले आहे. मात्र, महाल भागातील गडकरींच्या वाड्याकडे निघालेल्या या मोर्च्याला पोलिसांनी मधेच अडवण्याचा प्रयत्न केलाय. यावेळी मात्र युवक काँग्रेसचे कार्यकर्ते आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. यावेळी पोलिसांनी ठिकठिकाणी लावलेले बॅरिकेड्स ओलांडून पुढे जाण्याचा प्रयत्न केला असता पोलीस आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये ढकला-ढकल झाल्याचेही पाहायला मिळाले आहे. पोलिसांनी महाल आणि मंत्री नितीन गडकरींच्या घराच्या परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यावेळी काँग्रेस कार्यकर्ते आंदोलनावर ठाम



असल्याने काहीसे तणाव बघायाला मिळला.

देशात वाढती महागाई, बेरोजगारी, विद्यार्थ्यांचे प्रश्नयासह ई-२० इंधनाविरोधात नागपुरात युवक काँग्रेसच्या वतीने आज जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र या मोर्चाला पोलिसांनी परवानगी नाकारत हा मोर्चा काढता येणार नसल्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. असे असताना युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी हा मोर्चा काढत नितीन गडकरींच्या घराला वेढा घालण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी ठीकठिकाणी बॅरिकेड्स करून हा मोर्चा अडवण्याचा प्रयत्न केला. यावेळी मात्र कार्यकर्ते आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. ई-२० च्या निषेधार्थ निदर्शने यावेळी करण्यात आली. तसेच नितीन गडकरींच्या राजीनाम्याची देखील मागणी करण्यात आली आहे.

काँग्रेस शहर कार्यालय देवडिया भवन चिटणीस पार्क ते गडकरीवाडा महालपर्यंत हा मोर्चा काढण्यात आला. यावेळी गडकरी वाड्याला घेराव घालत आंदोलन करण्याचा युवक काँग्रेसचा निर्धार होता. मात्र पोलिसांनी हा मोर्चा शिवतीर्थ परिसरात अडवून धरलाय. तर महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले आहे.

### पेट्रोलच्या भावात पाणी विकून मोठी फसवणूक; गडकरींनी राजीनामा द्यावा-हर्षवर्धन सपकाळ

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- ई- २० इंधनाच्या नावाखाली थेट पेट्रोल आणि डिझेलमध्ये पाणी मिसळून वाहनधारकांची मोठी फसवणूक केली जात आहे. हा एक महाघोटाळा असून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी तत्काळ राजीनामा दिला पाहिजे,’ अशी मागणी महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

मुंबईतील टिळक भवन येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी भाजप, केंद्र आणि राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. यावेळी त्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या दिल्लीवारीच्या चर्चा, एसआरए घोटाळा आणि भाजप नेत्यांमधील नैराश्य यावरही सडकून टीका केली.

नागपूरमध्ये युवक काँग्रेसकडून नितीन गडकरींच्या निवासस्थानाबाहेर सुरू असलेल्या आंदोलनाचे समर्थन करत सपकाळ म्हणाले, ई-२० इंधनाचा निर्णय प्रत्यक्षात २०३० मध्ये लागू होणे अपेक्षित होते. मात्र, स्वतःच्या हितसंबंधी लोकांना आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी हा निर्णय घाईगडबडीत लागू करण्यात आला.

इथेनॉलच्या ऐवजी थेट पेट्रोल आणि डिझेलमध्ये पाणी मिसळले जात असल्याच्या मोठ्या तक्रारी समोर येत आहेत. यामुळे अनेक नागरिकांची वाहने खराब झाली आहेत.

या घोटाळ्यात गडकरी, मोदी आणि फडणवीस यांचा हात असल्याचा आरोप करत, इथेनॉलची वकिली करणाऱ्या नितीन गडकरी यांनी राजीनामा दिला पाहिजे. तसेच, पेट्रोलच्या भावात पाणी विकून फसवणूक केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशाची माफी मागितली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

### बिहारमध्ये भाजपाला धक्का! नितीन नबीन यांच्या बालेकिल्ल्यात प्रशांत किशोर यांचा ऐतिहासिक विजय

पाटण दि.३ (वृत्तसंस्था)- गेल्या ३० वर्षांपासून भाजपाचे वर्चेस्व असणाऱ्या बिहारमधील बांकीपूर विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत जन सुराज पक्षाच्या प्रशांत किशोर यांनी दणदणीत विजय मिळवला आहे. प्रशांत किशोर यांच्यासह भाजपासाठी देखील महत्वाच्या मानल्या जाणाऱ्या या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. माजी आमदार आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांची राज्यसभेवर निवड झाल्यानंतर रिक्त झालेला या जागेसाठी पोटनिवडणूक ३० जुलै रोजी मतदान झाले होते. भाजपाकडून येथे नीरज कुमार सिन्हा मैदानात होते. अखेरच्या ३२ व्या फेरीनंतर प्रशांत किशोर यांना ६४,१५१ मते मिळाली असून, १९,३२४ मतांनी त्यांनी विजय मिळवला आहे.

प्रशांत किशोर यांचा विजय भाजपासाठी मोठी धक्का मानला जात आहे. भाजपाकडून येथे मैदानात असलेल्या नीरज कुमार सिन्हा यांना या निवडणुकीत ४४,८२७ मते मिळाली तर, आरजेडीच्या रेखा कुमारी यांना १४,२७३ मते मिळवता आली. नितीन नबीन यांच्यानंतर रिक्त झालेल्या जागेसाठी ही निवडणूक (पान ४ वर)

# महिला कुस्तीपटूंच्या लैंगिक शोषणाच्या आरोपातून भाजपचे माजी खासदार बृजभूषण सिंह आणि विनोद तोमर निर्दोष

नवी दिल्ली दि.३ (वृत्तसंस्था)- महिला कुस्तीपटूंच्या लैंगिक छळ प्रकरणात भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे. दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू न्यायालयाने आज याबाबत निकाल जाहीर केला. बृजभूषण शरण सिंह यांची निर्दोष मुक्तता होताच फटाके फोडून समर्थकांनी जल्लोष केला. तर न्यायालयाच्या या निर्णयानंतर बृजभूषण शरण सिंह यांनीही पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

### महिला कुस्तीपटूंची हायकोर्टात धाव

महिला कुस्तीपटूंच्या कथित लैंगिक छळाच्या प्रकरणात राऊस अ‍ॅव्हेन्यू न्यायालयाने निर्दोष मुक्तता केल्यानंतर, बृजभूषण शरण सिंह म्हणाले, की, आरोप झाल्यानंतर मी पहिल्याच दिवशी म्हणालो होतो की जर कोणताही आरोप सिद्ध झाला किंवा तसा निकाल लागला, तर मी स्वतःला फाशी लावून घेईन. आज न्यायालयाने माझी सन्मानाने निर्दोष मुक्तता केली आहे. माझ्यासाठी आणि माझ्या समर्थकांसाठी ही आनंदाची बाब आहे... आजचा दिवस आनंदाचा आहे, असं बृजभूषण शरण सिंह यांनी स्पष्ट केलं आहे.

२०१६ ते २०१९ या काळात महासंघाचे कार्यालय, अधिकृत निवासस्थान आणि परदेश दौऱ्यात महिला कुस्तीपटूंचा लैंगिक छळ केल्याचा आरोप होता. २०२३ मध्ये विनेश फोगट, साक्षी मलिक आणि बजरंग पुनिया यांच्यासह देशातील आघाडीच्या कुस्तीपटूंनी दिल्लीच्या जंतरमंतरवर मोठे आंदोलन केले होते. आंदोलनानंतर दिल्ली पोलिसात गुन्हा दाखल होऊन आरोपपत्र सादर झाले होते आणि खटला सुरू झाला होता. मात्र आज न्यायालयाने पुराव्यांच्या अभावी बृजभूषण सिंह आणि सहआरोपी विनोद तोमर यांना या प्रकरणातूनदोषमुक्त केले आहे.

दिल्ली पोलिसांनी १५ जून २०२३ रोजी सहा वेळा खासदार राहिलेले बृजभूषण शरण सिंह विविध कलमांखाली गुन्हे दाखल केले होते. या प्रकरणी पोलिसांनी डब्ल्युएफआयचे निलंबित सहाय्यक सचिव विनोद तोमर यांनाही आरोपी केले होते.

### भाजपमधून बाहेर पडा; आम्ही तुम्हाला राज्याची पहिली ओबीसी मुख्यमंत्री करू-विजय वडेट्टीवार

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- भाजपच्या माजी मंत्री पंकजा मुंडे यांनी नुकतेच राजकारणातून निवृत्ती घेण्याबाबत काही संकेत दिले होते. त्यांच्या या विधानानंतर राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, आता यावर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी अत्यंत सूचक आणि मोठी प्रतिक्रिया दिली आहे. पंकजा मुंडे यांनी राजकारणातून निवृत्त होण्याऐवजी भाजपमधून बाहेर पडावे, आम्ही त्यांना महाराष्ट्राची पहिली ओबीसी मुख्यमंत्री करण्यासाठी पूर्ण साथ देऊ, अशी थेट आणि खुली ऑफरच वडेट्टीवार यांनी दिली आहे.

पंकजा मुंडे यांच्या निवृत्तीच्या संकेतांवर बोलताना वडेट्टीवार यांनी भाजपवर निशाणा साधला. ते म्हणाले, ’पंकजा मुंडे यांना जर असे वाटत असेल की पक्षात त्यांना योग्य तो न्याय मिळत नाहीये, किंवा त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या त्यागाला पक्षात काहीच महत्त्व दिले जात नाहीये, तर त्या नैराश्यातूनच त्यांनी राजकारणातून बाहेर पडण्याचे विधान केले असावे.’

पंकजा मुंडे यांना जाहीर विनंती करताना वडेट्टीवार पुढे म्हणाले की, ’पंकजाताईंना आमची एकच विनंती राहील की, तुम्ही एक मोठ्या आणि सक्षम ’ओबीसी नेत्या’ आहात. त्यामुळे राजकारणातून निवृत्त होण्यासारखे टोकाचे पाऊल न उचलता, तुम्ही बिंधास्तपणे पक्षातून बाहेर पडा आणि राज्याच्या ओबीसी समाजाचे खंबीर नेतृत्व करा.’

## नीट पेपरफुटी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ‘जेन झी’शी सरसंघचालक संवाद साधणार

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- देशभरात नीट पेपरफुटी प्रकरणावरून विद्यार्थ्यांमध्ये असंतोष व्यक्त होत असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) सरसंघचालक डॉ. मोहन भागवत ६ ऑगस्टला मुंबईत जेन झी आणि जेन अल्फा विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत.

इंडियाज इंटरनॅशनल मूव्हमेंट टू युनाइट नेशन्सच्या (आयआयएमयुएन) १५ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित वार्षिक अजिंक्यपद (चॅम्पियनशिप) परिषदेत हा संवाद होणार आहे.

कॉक्रोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली देशभरात नीट पेपरफुटी प्रकरणावरून जेन झी आणि जेन अल्फा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तरुण पिढीची केंद्रातील भाजपप्रणित नरेंद्र मोदी सरकारविरोधात जोरदार आंदोलने सुरू आहेत. तरुण भीडभाड न ठेवता पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याविरोधात रस्त्यावर उतरूनच नव्हे तर त्याना सहजसाध्य असलेल्या इंस्टाग्राम, यूट्यूबसारख्या समाजमाध्यमावरही व्यक्त होत आहेत. तरुणांचा आक्रोश इतका तीव्र होता की केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना अखेर राजीनामा द्यावा लागला. गेली अनेक वर्षे जनमानसाची नस अचूक ओळखणाऱ्या भाजपलाच नव्हे, तर संघालाही हा एक जबरदस्त धक्का मानला जात आहे. म्हणून गेल्या काही दिवसात संघाकडून आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात तरुण पिढीशी अधिक संवाद साधण्यावर तसेच त्यांची ऊर्जा राष्ट्रनिर्माणासाठी वापरण्याची भूमिका संघाच्या नेत्यांकडून सातत्याने मांडली जात आहे. त्या पार्श्वभूमीवर होत असलेल्या या कार्यक्रमात सरसंघचालक डॉ. मोहन भागवत ‘भारतीय मूल्यांच्या आधारे वैश्विक एकात्मता साध्य करण्यात युवकांची भूमिका’ या विषयावर जेन झी आणि (पान ४ वर)

### पक्षाच्या घटनेतील बदलांबाबत निवडणूक आयोगाचे सुनेत्रा पवार यांना पत्र

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांना भारत निवडणूक आयोगाने २७ जुलै, २०२६ रोजी पत्र पाठवले आहे. निवडणूक आयोगानं पक्षाच्या घटनेमधील दुरुस्त्यांसदर्भातील आवश्यक कागदपत्रे आणि प्रस्ताव सादर करण्यास सांगण्यात आलं आहे. निवडणूक आयोगानं राष्ट्रवादी काँग्रेसच्या घटनेतील अनेक बदलांना समर्थन देणारी आवश्यक कागदपत्रे आणि प्रस्ताव सादर करण्यात आल्या नसल्याचा उल्लेख पत्रात केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर २६ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रवादी काँग्रेसनं राष्ट्रीय कार्यकारिणी बोलावून सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड केली होती.

भारत निवडणूक आयोगाच्या मते, २६ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या ठरावात केवळ कलम १८(१) मध्ये दुरुस्तीचा उल्लेख आहे. तथापि, पक्षाने कलम ६, ७, १२, ३२ आणि ३६ मध्येही बदल केले आहेत. या बदलांना मान्यता देणारे प्रस्ताव आयोगाला प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळं राष्ट्रवादी काँग्रेसला आयोगाकडून या दुरुस्त्यांच्या समर्थनार्थ वैध कागदपत्रे आणि प्रस्ताव लवकरात लवकर सादर करावेत, असं सांगण्यात आलं आहे.

### सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशांची संख्या वाढवणारे विधेयक मंजूर

#### देणगी चोरी आणि विद्यार्थ्यांच्या मुद्यावर विरोधकांचा गदारोळ; संसदेचे कामकाज ठप्प

नवी दिल्ली दि.३ (वृत्तसंस्था)- जेव्हा संसदेचा प्रत्येक मिनिट सुमारे अडीच लाख रुपयांना पडतो, तेव्हा गोंधळाची किंमत केवळ राजकीयच नाही, तर आर्थिकही असते. पावसाळी अधिवेशनाच्या एकूण २५ दिवसांपैकी १५ दिवस उलटले आहेत, पण आतापर्यंत एकही दिवस असा गेला नाही, जेव्हा दोन्ही सभागृहांचे कामकाज कोणत्याही अडथळ्याशिवाय सुरळीत चालले असेल.

सोमवारीही लोकसभा आणि राज्यसभेत विरोधकांच्या गोंधळामुळे कामकाज वारंवार स्थगित करावे लागले. तथापि, या गदारोळातही दोन्ही सभागृहांमध्ये महत्त्वाची विधेयके आवाजी मताने मंजूर झाली. लोकसभेचे कामकाज सकाळी ११ वाजता सुरू झाले, परंतु विरोधी खासदारांच्या गोंधळामुळे कामकाज अवघ्या ३ मिनिटांत स्थगित झाले. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सदस्यांच्या वर्तनावर नाराजी व्यक्त केली आणि सभागृहाची प्रतिष्ठा राखण्याचे आवाहन केले.

दुपारी १२ वाजता कामकाज पुन्हा सुरू झाले. पीठासीन अधिकारी कृष्णा प्रसाद तेन्नेटी यांनी सदस्यांना आवश्यक कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास सांगितले, परंतु विरोधकांची घोषणाबाजी सुरूच राहिली. याच दरम्यान भारतीय सांख्यिकी संस्था विधेयक, २०२६ सादर करण्यात आले.

त्यानंतर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी बँकर्स बुक पुरावा विधेयक, २०२६ सभागृहात सादर केले. मात्र, विरोधकांचा गदारोळ सुरूच राहिला. गोंधळात लोकसभेचे कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

दुपारी २ वाजता सभागृहाचे कामकाज पुन्हा सुरू झाले. केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी सर्वोच्च (पान ४ वर)

### खासगी वाहनांवर पोलीस लिहणं किंवा पाटी लावणाऱ्यावर कारवाईचे संकेत

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- खासगी वाहनांवर पोलीस लिहिणे किंवा तशी पाटी लावणाऱ्यांवर लवकरच कारवाई होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पोलीस लिहिलेल्या खासगी वाहनांवर लवकरच निर्बंध आणण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती आहे. वाहतूक विभागाचे अप्पर पोलीस महासंचालक कार्यालयाने या संदर्भात राज्यातील सर्व पोलीस आयुक्त तसेच पोलीस अधीक्षकांना आदेश दिले आहे.

दरम्यान, पोलीस लिहिलेल्या खासगी गाड्यांची तपासणी होत नसल्याने अवैध वस्तूंच्या वाहतुकीसाठी अशा गाड्यांचा वापर होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. तसेच खासगी दुचाकीसह चारचाकी वाहनांवर पोलीस पाटी आढळ्यास महाराष्ट्र मोटर वाहन नियमासह मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाईची शक्यता आता वर्तवली जात आहे. मुंबई उच्च न्यायालयाने देखील खासगी गाड्यांवर पोलीस लिहिल्याबद्दल नाराजी व्यक्त करत कारवाईचे आदेश दिले आहेत.

### आधी मोदींना त्यांची डिग्री दाखवायला सांगा, मग मी माझ्या शैक्षणिक खर्चाच्या कर्जाचा सगळा तपशील जाहीर करतो, वडिलांच्या संपत्तीच्या चौकशीची मागणी होताच अभिजीत दिपकेंचे आव्हान

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- कॉकरोच जनता पार्टीचे (सीजेपी) संस्थापक अभिजीत दीपके यांचे वडील भगवान दीपके यांच्या मालमत्तेची चौकशी करण्याची मागणी नुकतीच आरटीआय कार्यकर्ते अमित तिवारी यांनी केली होती. यावर अभिजीत दिपके चांगलेच संतापले आहेत. त्यांनी याबाबत बोलताना थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ललकारले आहे. आमचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांनी डिग्री सार्वजनिक करावी. त्यानंतर मी माझ्या शैक्षणिक खर्चाच्या कर्जाचा सगळा तपशील जाहीर करेन. माझी पदवी खरी आहे. मी आशा करतो की, नरेंद्र मोदी यांची पदवीही खरी असेल, असे अभिजीत दिपके यांनी म्हटले. ते सोमवारी छत्रपती संभाजीनगर येथे प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

येत्या ५ तारखेला अभिजीत दिपके यांच्या छत्रपती संभाजीनगरमधील घरी कॉकरोच जनता पार्टीची बैठक होत आहे. याबाबत अभिजीत दिपके यांना विचारणा करण्यात आली. यावर त्यांनी म्हटले की, ५ तारखेला होणाऱ्या बैठकीला कॉकरोच जनता पार्टीचे प्रवक्ते आणि आंदोलन यशस्वी करण्यात प्रमुख भूमिका बजावणारे काही लोक उपस्थित असतील. कॉकरोच जनता पार्टीने भविष्यात काय करायचं, संघटना कशी वाढवायची, पुढचा रोडमॅप काय असेल, यावर चर्चा होणार असल्याचे अभिजीत दिपके यांनी सांगितले. गेल्या काही दिवसांपासून राजकीय नेते आणि इतर लोक मला भेटायला येत आहेत. पण आम्ही कोणत्याही राजकीय पक्षाशी जोडले गेलेलो नाहीत. गरज पडल्यास मी पुन्हा जंतर मंतरवर जाऊन आंदोलन करेन, असे अभिजीत दिपके यांनी सांगितले.

आम्ही राजकीय पक्ष स्थापन करावा, असे मिडीयाला वाटते. पण आमचा अजून तसा कोणताही विचार किंवा हेतू नाही. आम्हाला ही जनचळवळ ठेवायची आहे. देशात राजकारणाची परिस्थिती पाहता, नवा राजकीय पक्ष स्थापन करुन काय साध्य होणार आहे? निवडणुकीत मतंच (पान ४ वर)

### मध्य प्रदेशच्या दतिया येथील पोटनिवडणुकीत काँग्रेसचे घनश्याम सिंह विजयी

भोपाळ दि.३ (वृत्तसंस्था)- गेल्या अनेक वर्षांपासून भाजपाची सत्ता असलेल्या मध्य प्रदेशमध्ये काँग्रेसने सत्ताधारी भाजपाला मोठा धक्का दिला आहे. राज्यातील दतिया विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार घनश्याम सिंह यांनी भाजपाच्या आशुतोष तिवारी यांच्यावर सहा हजार १६ मतांनी दणदणीत विजय मिळवला आहे.

दतिया विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीसाठी ३० जुलै रोजी मतदान झाले होते. दरम्यान, आज झालेल्या मतमोजणीमध्ये पहिल्या फेरीत भाजपाचे उमेदवार आशुतोष तिवारी यांनी आघाडी घेतली. मात्र नंतर मतमोजणीच्या पुढच्या प्रत्येक फेरीत काँग्रेसचे उमेदवार घनश्याम सिंह यांनी आघाडी घेतली. बाराव्या फेरीपर्यंत घनश्याम सिंह यांची आघाडी १२ हजारांहून अधिक वाढली होती. मात्र शेवटच्या तीन फेऱ्यांमध्ये प्रत्येक फेरीत आशुतोष तिवारी यांना मताधिक्य मिळाले. मात्र हे मताधिक्य घनश्याम सिंह यांनी घेतलेली आघाडी कमी करण्यास अपुरे ठरले. अखेरीस १५ फेऱ्यांनंतर घनश्याम सिंह यांनी एकूण ६६ हजार ७५७ मते मिळवत ६ हजार १६ मतांनी विजय मिळवला. तर भाजपाच्या आशुतोष तिवारी यांना ६० हजार ७४१ मते मिळाली.

# डिजिटल आर्थिक क्रांतीतील नवे पर्व

**अलीकडेच** भारताने डिजिटल क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये एक एतिहासिक पाऊल टाकले. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लास्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि यूपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. ही सुविधा म्हणजे केवळ तांत्रिक सुधारणा नसून भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

भारतातील बँकिंग आणि आर्थिक व्यवहारांची पद्धत गेल्या दशकात आमूलाग्र बदलली आहे. एके काळी बँकेच्या शाखेत जाऊन पैसे काढण्यासाठी तासनतास रांगेत उभे रहावे लागायचे. त्यानंतर एटीएम यंत्रणा आली आणि ग्राहकांच्या आयुष्यात मोठी सोय निर्माण झाली. मात्र तंत्रज्ञानाची वाटचाल येथेच थांबली नाही. भारताने आणखी एक ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लास्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि यूपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. ही सुविधा म्हणजे केवळ तांत्रिक सुधारणा नसून भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताने जगाला यूपीआयच्या माध्यमातून डिजिटल व्यवहारांचे एक अद्वितीय मॉडेल दिले. यूपीआयने अगदी चहाच्या टपरीपासून मोठ्या शॉपिंग मॉलपर्यंत सर्वत्र व्यवहारांची पद्धत बदलून टाकली. आता त्याच यूपीआयचा वापर करून एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे बँकिंग क्षेत्र अधिक सुरक्षित, सुलभ आणि सर्वसमावेशक बनले आहे. कार्डलेस एटीएम म्हणजे अशी यंत्रणा ज्यामध्ये ग्राहकाला पैसे काढण्यासाठी एटीएम कार्ड मशीनमध्ये टाकावे लागत नाही. ग्राहक आपल्या मोबाईलवरील यूपीआय अनुप्रयोगाचा वापर करून एटीएमशी संवाद साधतो आणि काही सेकंदांमध्ये रोख रक्कम प्राप्त करतो. या प्रक्रियेमुळे कार्ड बाळगण्याची गरज संपते आणि अनेक प्रकारच्या फसवणुकीपासून संरक्षण मिळते.

या सुविधेची कार्यपद्धती अत्यंत सोपी आहे. ग्राहक एटीएमच्या पडद्यावर रोख रक्कम काढण्याचा पर्याय निवडतो. त्यानंतर आवश्यक रक्कम नमूद करतो. एटीएम मशीन लगेच एक विशेष क्यूआर कोड तयार करते. ग्राहक आपल्या मोबाईलमधील यूपीआय ॲप्स उघडून हा कोड स्कॅन करतो. त्यानंतर यूपीआय पासवर्ड टाकून व्यवहाराला मंजुरी देतो. काही क्षणांमध्ये एटीएममधून रोख रक्कम बाहेर येते. संपूर्ण प्रक्रियेत कार्डचा वापर होत नाही आणि कोणत्याही अतिरिक्त उपकरणाची आवश्यकता रहात नाही. सामान्य नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. अनेकदा आपण एटीएम कार्ड घरी विसरतो किंवा ते पाकिटासह हरवते. अशा वेळी अचानक पैशांची गरज भासल्यास मोठी अडचण निर्माण होते. कार्डलेस एटीएममुळे ही समस्या पूर्णपणे दूर होते. आज बहुतांश लोकांकडे स्मार्टफोन असतो आणि त्यावर यूपीआय ॲप्स सक्रिय असतो. त्यामुळे केवळ मोबाईलच्या सहाय्याने पैसे काढणे शक्य होते. सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर ही सुविधा अधिक महत्त्वाची ठरते. गेल्या काही वर्षांमध्ये एटीएम स्किमिंग, कार्ड क्लोनिंग आणि डेटा चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. काही गुन्हेगार एटीएममध्ये गुप्त उपकरणे बसवून कार्डची माहिती चोरत आणि त्याद्वारे बनावट कार्ड तयार करत. परिणामी ग्राहकांच्या खात्यातील पैसे लुटले जात. कार्डलेस व्यवहारांमध्ये कार्डच वापरले जात नसल्यामुळे अशा प्रकारच्या गुन्ह्यांना मोठ्या प्रमाणात आळा बसतो. त्यामुळे ग्राहकांचा विश्वास वाढतो आणि बँकिंग व्यवहार अधिक सुरक्षित बनतात.

आज देशातील लाखो नागरिक यूपीआयचा वापर करतात; परंतु अनेकांकडे एटीएम कार्ड नसते किंवा त्याचा वापर करण्याची सवय नसते. मोबाईलच्या माध्यमातून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे डिजिटल व्यवहार आणि पारंपरिक रोख व्यवहार यांच्यातील दरी कमी होते. ग्रामीण भागातील नागरिक अधिक आत्मविश्वासाने बँकिंग सेवांचा वापर करू शकतात. ज्येष्ठ नागरिकांसाठीही कार्डलेस एटीएम वरदान ठरू शकते. अनेकदा वयोमानानुसार एटीएम कार्ड हाताळणे, कार्डचा पासवर्ड लक्षात ठेवणे किंवा मशीनमध्ये कार्ड योग्य प्रकारे वापरणे कठीण जाते. मोबाईलवरील परिचित यूपीआय ॲप्स वापरून व्यवहार करणे तुलनेने सोपे वाटू शकते. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ज्येष्ठ नागरिकांना या सुविधेचा मोठा लाभ होऊ शकतो. एकापेक्षा जास्त बँक खाती असलेल्या ग्राहकांसाठी ही सुविधा आणखी उपयुक्त आहे. पूर्वी वेगवेगळ्या खात्यांसाठी अनेक कार्ड सांभाळावी लागत. आता एकाच यूपीआय अनुप्रयोगामध्ये विविध खाती जोडलेली असल्यास आवश्यक त्या खात्यातून थेट पैसे काढता येतात.

विशेष म्हणजे भारताने या क्षेत्रात जगासमोर एक वेगळे उदाहरण निर्माण केले आहे. अनेक विकसित देशांमध्ये कार्डशिवाय पैसे काढण्याच्या सुविधा उपलब्ध असल्या तरी त्या बहुधा विशिष्ट बँकेपुरत्या मर्यादित असतात. भारताने मात्र सर्व बँका, सर्व यूपीआय ॲप्स आणि सर्वसामान्य नागरिक यांना जोडणारी एक सार्वत्रिक आणि परस्परसंवादी व्यवस्था विकसित केली आहे. त्यामुळे कोणत्याही बँकेचा ग्राहक कोणत्याही सक्षम एटीएमवर जाऊन यूपीआयच्या साहाय्याने पैसे काढू शकतो. ही संकल्पना जागतिक स्तरावर अत्यंत अभिनव मानली जाते. डिजिटल भारत मोहिमेला या सुविधेमुळे मोठी चालना मिळाली आहे. डिजिटल व्यवहारांमध्ये भारताने आधीच जागतिक नेतृत्व प्राप्त केले आहे. यूपीआय व्यवहारांची संख्या आणि त्याचा व्यापक वापर पाहता अनेक देश भारताच्या अनुभवातून शिकण्याचा प्रयत्न करत आहेत. कार्डलेस एटीएम ही त्याच यशस्वी प्रवासातील पुढची पायरी आहे. आर्थिक सर्वसमावेशकतेच्या दृष्टीनेही या सुविधेचे महत्त्व मोठे आहे. बँकिंग सेवा प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवणे हे कोणत्याही विकसित अर्थव्यवस्थेचे ध्येय असते. डिजिटल साधनांच्या मदतीने नागरिकांना अधिक सक्षम करणे आणि त्यांना वित्तीय प्रणालीशी जोडणे हे या तंत्रज्ञानामुळे अधिक सुलभ झाले आहे. गावातील शेतकरी, छोटा व्यापारी, विद्यार्थी, गृहिणी किंवा ज्येष्ठ नागरिक प्रत्येकाला याचा थेट लाभ होऊ शकतो. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, आवाजावर आधारित सेवा आणि प्रादेशिक भाषांमधील संवाद यांचा वापर वाढल्यास कार्डलेस एटीएम आणखी लोकाभिमुख होतील.

# पेपर फुटीनंतर पोलिसांच्या लाठ्या नि अश्रुधूर

**कॉक्रोच** जनता पार्टीचा उदय देशाच्या सरन्यायाधिशांच्या एका टिपणीतून झाला, त्यावेळी अमेरिकेत शिक्षण घेत असलेल्या अभिजीत दीपकेच्या कल्पनेतून क्रॉक्रोच जनता पार्टीची सोशल मिडियावर निर्मिती झाली आणि देशातील अडिच कोटी तरूणाईने त्याला प्रतिसाद दिला. कॉक्रोच जनता पार्टी ची देशातील राजकारण्यांनी टिंगल- टवाळी केली. ही तर झुरळांची पार्टी म्हणून हिणावले गेले. भाजपाची बी टीम म्हणून कोणी संबोधले तर अभिजीत हा तर केजरीवालांचा माणूस आहे अशी टीका झाली. अमेरिका सोडून अभिजीत दिल्लीत आला तेव्हा जंतरमंतरवर जेमतेम दोन- चार हजार तरूण जमले होते. तेव्हा हे आंदोलन गुंडाळले जाईल अशी भाकीते व्यक्त करण्यात आली. कॉक्रोच जनता पार्टीची पेपर फुटीच्या निषेधार्थ देशात लहान- मोठ्या शहरातून आंदोलने झाली पण त्याकडे कोणी गांभीर्याने बघितले नाही. जून महिन्यात येऊन अभिजीतच्या नेतृत्वाखाली कॉक्रोच जनता पार्टीने दिल्लीत येऊन पुन्हा जंतरमंतरवर ठिय्या मांडला तेव्हाच मोठ्या आंदोलनाची चाहूल लागली होती. सोनम वांगचूक हे लडाखहून एक ब'ग घेऊन दिल्लीला आले व थेट जंतरमंतरवर आंदोलनात सहभागी झाले. त्यांनी शिक्षण व्यवस्थेच्या सुधारणेसाठी आमरण उपोषण सुरू केले तरी सरकारने तिकडे लक्ष दिले नाही. जंतरमंतरवर काही विद्यार्थीही उपोषणला बसले तरी त्याला मिडियातून प्रसिध्दी मिळत नव्हती. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा व पेपर फुटीनंतर मानसिक तणावामुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना एक कोटी रूपये नुकसान भरपाई सरकारने द्यावी अशा मागण्या कॉक्रोच जनता पार्टीने पुढे केल्या. सोनम यांची प्रकृती झपाट्याने खालावली आणि जंतरमंतरवर तरूणांची गर्दी वाढू लागली. संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या दोन दिवस अगोदर दिल्ली पोलिसांनी भल्या पहाटे सोनम यांना उचलले व पांढऱ्या चादरीत गुंडाळून थेट सफरदजंग इस्पितळात दाखल केले. तिथेच आंदोलनाची धार तीव्र झाली.



खरे तर तीन आठवडे जंतरमंतरवर आंदोलन व उपोषण चालू होते, पण केंद्र सरकारच्यावतीने कोणीही त्यांच्याशी संवाद साधला नाही. भाजपाने युपीए सरकारच्या विरोधात देशभर विविध मुद्यांवर आंदोलने करून देशाची सत्ता मिळवली. पण जंतरमंतरवर आंदोलन करीत असलेल्या विद्यार्थ्यांना जाऊन भेटावे, त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे, सरकारची बाजू समजावून सांगावी असे कुणालाही वाटले नाही. राहूल गांधी व काँग्रेस पक्ष पेपर फुटीच्या मुद्यावर देशभर आंदोलने करीत आहेत. त्यांना काही ठिकाणी परवानगी नाकारण्याचे प्रकार घडले आहेत. वारंवार होत असलेल्या पेपर फुटीच्या घटनांमुळे सरकारची बदनामी होतेच. काँग्रेसने हा मुद्दा शस्त्र म्हणून वापरायला सुरूवात केली म्हणून भाजपानेच कॉक्रोच जनता पार्टीला याच मुद्द्यावर आंदोलन करायला सांगितले असाही प्रचार झाला. जंतरमंतरवर राहुल गांधी का फिरकले नाहीत ? म्हणून प्रश्न विचारले गेले. जंतरमंतरवरील आंदोलनात कोणत्याही राजकीय पक्षांचा झेंडा नव्हता. कोणत्या राजकीय नेत्याला मंचावर बोलाविण्यात आले नाही. काँग्रेस, उबाठा सेना, सपा, आप आदी विरोधी पक्षांच्या नेत्यांनी आंदोलनाला तिथे जाऊन पाठिंबा दिला. पण प्रत्यक्ष मोर्चात कुठेही आघाडीवर राजकीय नेता नव्हता. मग सरकारला आंदोलकांशी चर्चा करायला अडचण का वाटत होती ? कोण आंदोलक आहेत, ते स्वत:ला काय समजतात, सरकारला आव्हान देतात म्हणजे काय, मंत्र्यांचा राजीनामा मागण्याची त्यांची हिम्मत कशी होते, त्यांची पात्रता काय, अशा समजुतीत राज्यकर्ते असावेत. शेतकरी आंदोलन पोलीसांच्या बळावर याच सरकारने दडपले होते. सातशे शेतकऱ्यांचे बळी गेले तरी सरकार नमले नव्हते. आंदोलक शेतकऱ्यांना दिल्लीच्या सीमेवरच रोखले होते. विद्यार्थ्यांचे आंदोलन प्रखर झाले तर पोलिसांच्या बळावर दडपता येईल हाच फॉर्म्युला दिल्लीत पुन्हा वापरण्यात आला. चलो संसद भवन म्हणून निघालेल्या मोर्चावर पोलिसांनी निर्घृण लाठीमार केला. मोर्चात पंधरा ते पंचवीस वयाचे विद्यार्थी होते. मुला- मुलींना पोलिसांनी त्यांच्या खाकी वर्दीचा इंगा दाखवला. चपला, बूट , अस्ताव्यस्त पडले. डोकी फुटली, चेहरे रक्तबंबाळ झाले, पोलिसांच्या बळापुढे खाली पडलेल्या मुलांनाही लाठ्यांनी झोडपून काढले. पोलिसांवरही दगडफेक झाली. शंभर पोलीस जखमी झाले. पण दिल्लीत व जंतर मंतरभोवती कडक पोलीस बंदोवस्त असताना हे दगड आले कोठून, याचे उत्तर मिळाले नाही. आदल्या रात्री दगडांनी भरलेल्या पिशव्या घेऊन एक व्ह'न तिथे आल्याची माहिति आंदोलकांनी पोलिसांना दिली होती मग तत्काळ कारवाई का झाली नाही?

शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी कॉक्रोच जनता पार्टीने केलेले आंदोलन हे नेतृत्वहिन होते. अभिजीत दीपके हा काही अनुभवातून कार्यकर्ता ते नेता असा बनलेला नाही. त्याला पोलिसांनी उचलून केरळ हाऊसमधे नेले. त्याचे दोन सहकारी सौरभ दास व आशुतोष रांका हे केंद्रीयमंत्री जेपी. नड्डा यांना मागण्यांचे निवेदन देण्यासाठी त्यांच्या कार्यालयात गेले. सोनम वांगचूक यांना तर पोलिसांनी अंधारातच उचलून नेले. संसदेच्या अधिवेशनेच्या पहिल्या दिवशी एक लाखावर तरूणाई जंतरमंतरकडे जमली होती. नेता नसल्याने कोणत्याही रस्त्याने विद्यार्थ्यांचे समुह घोषणा देत फिरत होते. नेमकं काय करायचे, कुठे जायचे हे कुणाला ठाऊक नव्हते. अशा दिशाहिन, शस्त्रहिन विद्यार्थ्यी समुहावर बेछूट लाठीमार करणे व त्यांना रक्तबंबाळ होईस्तोवर मारणे किती योग्य आहे ? रस्त्यावर उतरलेले विद्यार्थी हे काय मोदी सरकारचे शत्रू होते का, देशद्रोही होते का , शिक्षण पध्दतीत सुधारणा व्हावी असे त्यांना वाटते, पेपर फुटीचे प्राय:चित्त म्हणून शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा अशी त्यांची मागणी होती, मग लाठीमार व अश्रुधुराच्या नळकांड्या फोडून या नव्या पिढीवर पोलिसांनी सूड का उगवला ?

आंदोलनात विद्यार्थी नसलेले अनेक जण घुसले होते. समाज कंटकांनी हात धुवून घेतले. पोलिसांवर दगडफेक करणारे नेमके कोण होते ? त्यांना कोणी या कामगिरीवर कोणी पाठवले होते ? रस्त्यावरील मोटारींच्या काचा फोडल्या गेल्या. पंजाब, हरयाणा, युपी मधून अनेक जण या आंदोलनात सहभागी झाले होते. त्याचा शिक्षणाशी संबंधही नव्हता. काही कुरिअर बॉय होते,काही ट्रक ड्रायव्हर होते, कुणी रोजंदारीवर काम करणारे होते. आंदोलनात हिंसाचार कसा झाला, कुणी घडवला, विद्यार्थ्यांना पुढे करून आंदोलनाला गालबोट

कुणी लावले हे पुढे आले पाहिजे. तीन वेळा आमदार म्हणून निवडून आलेल्या नेत्याला पोलिसांनी बॅरिकेट ओलांडताना उचलून फेकले असे व्हिडिओ पोस्ट झाले आहेत. पण त्या आमदाराला तिथे कुणी जायला सांगितले होते ? काश्मीर हा भारताचा भाग नाही असे सांगणाऱ्या अरूंधती राय जंतरमंतरवर पोचल्या होत्या. २६-११ च्या मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील अजमल कसाब याची फाशी रद्द करून त्या दया दाखवावी म्हणून न्यायालयात दाद मागणारे कॉलिन गोन्सालवीस आंदोलनाच्या ठिकाणी गेले होते. नंदिता नारायण यांनी बस नाम रहेगा अल्ला का हे पाकिस्तानी गीत तिथे गायले. पुन्हा ३७० कलम लागू करावे, अशी मागणी काश्मीरचे खासदार आगा मोहमंद यांनी केली. हे सर्व सरकार विरोधी जंतरमंतरवर कसे काय आले ?

परीक्षा पे चर्चा अशा कार्यक्रमातून विदयार्थ्यांशी नियमित संवाद साधणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी पेपर फुटीवर का बोलत नाहीत, असे प्रश्न विरोधी पक्षाने वारंवार विचारले. एनडीएच्या संसदीय पक्षाच्या बैठकीत मोदी म्हणाले, पेपर फुटीचा विषय अतिशय चिंताजनक आहे, तेरा जणांना अटक झाली आहे, ते जेलमधे आहेत. जे दोषी आहेत, त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. : शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीविषयी त्यांनी एक शब्दही उच्चारला नाहीः.

**- डॉ. सुकृत खांडेकर**

# अविस्मरणीय पावसाळी सहल

**मैत्री** ही आयुष्यातील अशी एकमेव गुंतवणूक आहे, जिचा परतावा फक्त आनंदाच्या स्वरूपात मिळतो. मला आयुष्यात मिळालेली सर्वात सुंदर भेट म्हणजे नोकरीत असताना बॉस, आणि आत्ता आम्ही दोघेही निवृत्त, परंतु 'विश्वासार्हता' या गुणावर आधारित मित्रवर्य श्री. दत्तात्रय नागपूरकर यांच्याबरोबर असलेली आणि दिवसेंदिवस वर्धिष्णु होत असलेली मैत्री. हाच धागा पकडून आम्ही म्हणजेच चिन्मय, चैताली, चित्रा, दत्तात्रय नागपूरकर व सहचारिणी मंजुषा यांनी कन्नूर, कुर्ग, ऊडुपी, गोकर्ण सहल संपन्न केली.

पुण्याहून कन्नूर येथे विमानप्रवास करून कन्नूर एअरपोर्टवर उतरल्यावर तेथील अतिशय सुंदर वातावरण, बाहेर पडताच प्रशस्त व आखीवरेखीव रस्ते, रंगीबेरंगी फुलांच्या झाडांतील सुशोभित दुभाजक, नक्षीकामातील विद्युत दिवे पाहून पुढील प्रवासाचा ऊत्साह अधिकच वाढला. कन्नूरमधे सर्वदूर चहाचे मळे, त्याचबरोबर नारळ, केळी, फणस, पोपई यांच्या बागा दिसतात. पुर्वी आपण 'मेंगलोरी कौलांचे घर' असे म्हणत असू, आज सर्वत्र आरसीसी पध्दतीची घरे दिसून येतात, परंतु कन्नूरमधे काही जणांनी कौलारू घरांचा वारसा अद्यापि जपून ठेवला आहे. अशी कौलारी बैठी घरे पाहून मन प्रफुल्लित होते.

कन्नूरमधील सेंट एन्जेलो फोर्ट हा सन १५०५, पोर्तुगीज काळातील लाल रंगातील चिऱ्यासारख्या विटा, दगडात बांधलेला किल्ला आजही भक्कम स्थितीत आहे. प्रवेशद्वारावर लोखंडी खिळे, आतील बाजूस वनराई, प्रशस्त जागा, किल्याला लागूनच फेसाळलेल्या कन्नूर किनारपट्टीवरील समुद्राच्या लाटांचा आवाज कानी येतो. पायमबालाम बीचवर सागरकिनारी फिरण्याचा मनसोक्त आनंद घेता येतो.

कन्नूरहून आम्ही समुद्रसपाटीपासून ५००० फूट म्हणजेच १५२५ मीटर ऊंचीवर असलेल्या कुर्ग ह्या हिलस्टेशन - थंड हवेच्या ठिकाणी गेलो. कुर्ग हे कर्नाटकातील सर्वांगसुंदर जिल्ह्याचे मुख्यालय असून त्याला मडिकेरी हेही नाव आहे. प्रचंड धोकादायक घाटातून धुक्यात हरवलेले डोंगर, डोंगरातील वळणावळणाच्या रस्त्यांवर दुतर्फा असलेली झाडे, चहाचे मळे, घनदाट जंगल, विस्तीर्ण कॉफीचे मळे, संत्र्यांच्या बागा, हसमुखी भातशेती यांनी बहरलेलं हे ठिकाण, जिथे ऊन्हाळाही थंड वाटतो , असं कुर्ग खरोखरच लावण्यमय आहे. कर्नाटक राज्यातील मडिकेरी म्हणजेच कुर्ग हा प्रदेश भारतातील स्कॉटलंड किंवा दक्षिणेचे काश्मीर म्हणून ओळखला जातो.

मुळ कुर्ग शहरामध्ये तसेच आजूबाजूस बरीच प्रेक्षणीय ठिकाण आहेत. नैसर्गिक तळ्यातील सन १८२० मध्ये बांधण्यात आलेल श्री.ओंकारेश्वराचे मंदिर, जनरल थिमय्या आणि फिल्डमार्शल करिअप्पा यांचे पुतळे, मडिकेरीचा किल्ला शहराच्या अगदी मध्यभागात आहेत.तिथेच सर्व गरम मसाल्याच्या पदार्थांची (काळी मिरी, दालचिनी , वेलची, जायफळ, तमालपत्र इ.) तसेच कॉफी व विविध प्रकारच्या चॉकलेट्सची मोठी बाजारपेठही आहे. गर्द झाडीतून कॉफीचे मळे तसेच मसाल्याच्या बागांच्या सफरी साठी बोईकेरी हे सुप्रसिद्ध ठिकाण . तेथील कॉफीमळे, कॉफी प्रक्रिया ऊद्योग, हॅन्डीक्राफ्ट एम्पोरियम, चॉकलेट फॅक्टरी, रेशीम उद्योग हे पाहणे, हा एक विलक्षण अनुभव.

संरक्षित निसर्ग पाहायला 'निसर्गधाम' हे कावेरी नदीने वेढलेलं हे एक बेट असून झुलत्या पुलावरून तेथे जावे लागते. येथे बांबूची जंगले आहेत. जंगलातील मचाण ऊत्तम असून कावेरी नदीचा खळखळाट येथे ऐकू येतो. येथेच बर्ड पार्क असून तिथे रंगीबेरंगी पक्षी महाकाय इमू , रंग बदलणारे सरडे त्याचबरोबर हरणं, काळवीट पाहायला मिळतात. जागोजागी राज्यातील विविध समाजातील लोकपरंपरा, सण उत्सव यांची ओळख करून देणारी शिल्पे आपलं मन प्रफुल्लित करतात. कुर्गपासून जवळच कुशलनगरला बुध्द मठांचे दर्शन मनाला समाधान आणि शांती देते. नामद्रोलिंग मठ - गोल्डन टेंपल हे तीन मजली बौध्द मंदिर असून येथे ५००० हून अधिक भिक्खुंचे निवासस्थान आहे. कुर्ग येथून ३९ किलोमीटरवर असणारं भागमंडला येथे कावेरी, कनिका आणि संज्योती या नद्यांचा त्रिवेणी संगम आहे. तिथलं भागमंडलेश्वराचं शिवमंदिर , केशव म्हणजेच विष्णु मंदिर ,श्री गणेश मंदिर श्री सुब्रमण्यम स्वामी मंदिर आणि श्री लक्ष्मी माता मंदिरातील नयनरम्य मूर्ती आणि त्यातील कोरीव काम पाहण्याजोगं.

कुर्ग पासून ४५ किलोमीटरवर असलेल्या तालकावेरी येथे दक्षिणेची गंगा समजल्या जाणाऱ्या कावेरी नदीचं उगमस्थान आणि पूजास्थान, भगवान शंकर व श्रीगणपती बाप्पाची मंदिरं आहेत. काटाकेरी घाट देखणा आणि अतिशय स्वच्छ आहे.आम्हांला तर याठिकाणी धुक्यातून वाट काढत जावं लागलं. अगदी स्वर्गीय सौंदर्य अनुभवलं आम्ही.कुर्ग पासून साधारण आठ किलोमीटर अंतरावर असणारे अब्बे फॉल्स हा नयनरम्य धबधबा निसर्गाच्या अगदी अंतरंगात घेऊन जातो, असे वाटते. सायंकाळी कुर्ग गावातून सहज चालत जाण्याच्या टप्प्यावरचे ठिकाण म्हणजे 'राजाजी सीट'. छोटंसं उद्यान, अतिशय सुंदर सुरेल आवाजात गाण्यांच्या तालावर नाचणारी थुईथुई रंगीबेरंगी कारंजी, लहानग्यांसाठी फुलराणी आणि येथील मावळत्या दिनकराचं लोभसवाणं दर्शन यामुळेच दिवसअखेरही गंमत येते.

दुबारे एलिफंट कॅम्प हा हत्तींच्या जलक्रीडा अगदी जवळून पाहण्याअनुभवण्याचा पॉईट. पण एका दुर्घटनेनंतर सध्या बंद आहे. परंतु हत्तीसाठी प्रसिद्ध हरंगी धरण बॅकवॉटर हा भाग आहे. आम्हांला येथे सहा हत्तींचं जवळून दर्शन झाले. संपूर्ण प्रदेश अगत्यशील लोकांसाठी व पाहुणचारासाठी प्रसिद्ध आहे आणि ही अगत्यशीलता आपल्याला अगदी येथील हॉटेल्समधूनही अनुभवायला मिळते. येथील स्त्रियांची साडी नेसण्याची पध्दतही वैशिष्ट्यपूर्ण आहे.

कुर्गहून ऊडुपीकडे जाताना रस्त्यावर असणारे महालक्ष्मी मंदिर, आवारातील वैशिष्ट्यपूर्ण नागमंदिर यांचे दर्शन घेतले. सौ. चित्रा नागपूरकर यांनी 'कोटी गीता लेखन यज्ञ' अंतर्गत स्वलिखीत पूर्ण केलेली गीता, 'ऊडुपी गीता मंदिर' येथे अर्पण केली, त्या क्षणाचं साक्षीदार होताना आम्ही सर्वांनीच मनसोक्त आध्यात्मिक आनंद घेतला. उडुपी येथील प्रसिद्ध श्रीकृष्ण मंदिराचे दर्शन घेतल्यानंतर पावसाळी वातावरणात गरमागरम भात, सांबार, ताक व खीर प्रसादाचा लाभपण आम्हांला मिळाला.

श्री.श्री. जगद्गुरू शंकराचार्य महासंस्थान दक्षिणाम्नाय श्री. शारदापीठम, श्रृंगेरी येथे पांढरेशुभ्र धोतर व उपरणे अशी भारतीय पोशाखाची परंपरा आजही आहे. जगद्गुरू श्री.श्री. भारतीतीर्थ यांचे दर्शन व आशीर्वाद घेण्याचे भाग्य लाभले. गोशाळा, निसर्गरम्य श्री विद्यातीर्थ सेतू अशी ठिकाणं पाहिली. तसेच शांत व रमणीय परिसर लाभलेला मालपे बीचवर सुंदरशी संध्याकाळ अनुभवली.

ऊडुपी सोडल्यावर वाटेत, प्रसिद्ध श्री. मुरूडेश्वराचे दर्शन घेतले. तिन्ही बाजूनी समुद्रांनी वेढलेल्या, खास दाक्षिणात्य पध्दतीत व सुंदर शिल्पाकृतीनी रेखाटलेल्या विलोभनीय प्रवेशद्वारातून आत जावे लागते.

नैसर्गिक पर्वतराजीत श्री. भगवान शंकराची ध्यानस्थ मुद्रेतील महाकाय मूर्ती बरोबरच इतर देवदेवतांच्या मूर्ती व वातावरणात आपण कधी समरस होतो, ते कळतच नाही. प्रवेशद्वाराच्या विसाव्या मजल्यावरून अथांग सागर आणि डोंगरावर विराजमान ध्यानस्थ भगवान शंकर आणि संपूर्ण परिसराचे विहंगम दृष्य पाहून अवर्णनीय आनंद मिळतो.

गोकर्ण महाबळेश्वर देवस्थानचे दर्शन घेतल्यानंतर महाकाय दगडातील प्रचंड पण पांढऱ्याशुभ्र लाटा, सोनेरी वाळू 'ओम बीच', गोकर्ण येथील सूर्यास्त, समुद्र काठावर बसून गरमागरम चहापान आणि किर्नायावर पाण्यातून दूरवर चालण्याचा आम्ही सर्वांनीच मनमुराद आनंद घेतला. अशा या अविस्मरणीय आध्यात्मिक व निसर्गरम्य सहलीचा ओतप्रोत आनंद मोबाईलमधे चित्रीत करून मित्र, नातेवाईक यांना पाठवून त्यांनाही आम्ही आमच्या आनंदात सहभागी करून घेतले. आयुष्यातील काही प्रवास अविस्मरणीय असतात आणि ते आपल्याला आनंदात जगण्याची उर्जा देतात, हे अगदी नक्कीच.

**- चंन्द्रशेखर लंगडे**

# एचडीएफसी बँक, वरिष्ठांना दंड अनाकलनीय निर्णय

**एचडीएफसी** बँकेने नुकताच आपल्याच वरिष्ठ अधिकाऱ्यांना एका प्रकरणात प्रत्येकी एक लाख रुपये दंड केला आहे. ज्या प्रकरणासाठी त्यांना दंड केला आहे, त्या प्रकरणात त्यांचा वैयक्तिक काहीही दोष नाही असेही जाहीर करण्यात आले आहे.

या दंडप्रकरणी रिझर्व बँक ऑफ इंडियाने वरिष्ठ अधिकाऱ्यांना दंड का केला याबाबतचा तपशील बँकेकडे मागितला आहे.

**घटनाक्रम -** एचडीएफसी बँकेने एम एस आर टी सी या महामंडळाला (महाराष्ट्रातील एसटी महामंडळ ) रुपये ४५ कोटी व्याजाच्या फरका पोटी दिले, तथापि बँकेच्या बुक्स मध्ये ही रक्कम मार्केटिंग खर्च पोटी दिली असे दाखवण्यात आले होते. बँकेच्या अंतर्गत तपासणीत ही बाब उघडकीस आली. या प्रकरणी तपास करण्यासाठी बँकेने अंतर्गत शिस्त समितीची स्थापना केली. या समितीने प्रकरणाची सविस्तर तपासणी करून आपला अहवाल संचालक मंडळास सादर केला.

या अहवालाच्या आधारावर बँकेने बँकेचे सीईओ आणि मॅनेजिंग डायरेक्टर शशीधर जगदिशन, सीएफओ श्रीनिवासन वैद्यनाथन, आणि रिटेल असेट्स हेड अरविंद व्होरा यांना प्रत्येकी रुपये एक लाख दंड केला आहे. या प्रकरणाची माहिती रिझर्व बँक ऑफ इंडिया आणि

शेअर बाजारास देण्यात आल्याचेही कळते. या दंडाच्या व्यतिरिक्त तिन्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांना या प्रकरणाबाबत पत्र देण्यात आल्याचेही कळिवण्यात आले आहे. या प्रकरणात तीनही अधिकाऱ्यांचा व्यक्तिगत कोणताही स्वार्थ नव्हता असेही बँकेने म्हटले आहे.

**बँकिंग मधील नवीन प्रथा-** एचडीएफसी बँकेने आपल्याच वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना दंड करून एक नवा पायंडा सुरू केला आहे. या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या वेतनाचा विचार करता दंडाची रक्कम ही अत्यंत किरकोळ स्वरूपाची आहे. किंवा हा दंड प्रतीकात्मक स्वरूपाचा आहे असेही कदाचित बँकेला दाखवायचे असेल. या प्रकरणाचा वृत्तपत्रातून बभ्रा झाल्यामुळे बँकेला चौकशी करणे भाग पडले असावे. बँकेच्या आकाराच्या दृष्टीने रुपये ४५ कोटी ही रक्कम फारशी मोठी नाही. तथापि ठेवींवर जास्त व्याज देता येत नाही, म्हणून व्याजा पोटी ची रक्कम अन्य खात्याला नावे टाकून महामंडळाला देणे ही अकाउंटिंग चूक नसून अफरातफरच आहे. यासाठी जबाबदार असलेल्या तिन्ही वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना क डक पत्र आणि दंड आकारून बँकेने हे प्रकरण त्यांच्या बाजूने बंद केले आहे. असे असले तरी या निमित्ताने अनेक प्रश्न निर्माण होतात, ज्याची उत्तरे बँकेने देणे अपेक्षित आहे.

**जुन्या घटनांशी संबंध-** या बँकेच्या अकार्यकारी अध्यक्षांनी काही दिवसांपूर्वी राजीनामा दिला ते प्रकरण अजून ताजे आहे. बँकेतील काही प्रथा मला नैतिकदृष्ट्या योग्य वाटत नसल्यामुळे मी राजीनामा देत आहे असे त्यांच्या राजीनामा पत्रात उद्घृत करण्यात आले होते. या प्रकरणाचा त्याच्याशी काही संबंध आहे का हा मुद्दा शिल्लक राहतो. या बँकेच्या भाग भांडवलात गुंतवणूक करणारे हे परदेशस्थ नागरिक आणि संस्था आहेत. त्यांनी या प्रकरणाबाबत विचारणा केल्याचे वृत्त आहे. गुंतवणूकदारांना आपल्या गुंतवणुकीची काळजी असणे हे स्वाभाविक आहे. आपण गुंतवणूक केलेल्या संस्थेत कारभार पारदर्शक पद्धतीने चालावा अशी सर्व गुंतवणूकदारांची अपेक्षा असते. खाजगी क्षेत्रातील भारतामधील सर्वात मोठ्या बँकेमध्ये हा प्रकार घडावा याबद्दल देशातील बँकिंग वतुर्ळात चिंता आहे.

हा प्रकार सरकारी बँकेत घडला असता तर संसदेमध्ये देखील गदारोळ झाला असता. खाजगी म्हणजे सर्व व्यावसायिक, खाजगी म्हणजे सर्व चांगले असा बँकिंग मध्ये असलेला समज या घटनेमुळे मोडीत निघाला आहे.

रिझर्व बँकेने या प्रकरणाची माहिती मागितल्यामुळे नियामका कडून नव्याने काही कारवाई होण्याची भीती आहे. या सर्व प्रकरणाचा बँकेच्या शेअर वर कमी अधिक प्रमाणात परिणाम झालेला आहे.पारदर्शी व्यवहारासाठी प्रसिद्ध असलेल्या बँकिंग व्यवसायात अशा घटना घडणे हे बँकिंगला फारसे भूषणावह नाही. बँकेमधील विश्वासार्हतेला तडा देणारी ही घटना आहे. झाले ते अयोग्य आहे असे सर्वसामान्य बँकर्सचे मत आहे.

**- डॉ. अभय मंडलिक**

लेखक बँकिंगचे अभ्यासक असून खामगाव अर्बन को-ऑपरेटिव बँकेचे संचालक आहेत

# विष्णुनगर जैन मंदिरात प्रथमच सिद्धचक्र विधान उत्साहात



छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) – श्री १००८ चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिर विष्णुनगर येथे अष्टानी का पर्व निमित्त आयोजित सिद्धचक्र विधानास महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमात याप्रसंगी सविता घोडके, वैशाली धोंगडे, सविता खुळे, ज्योती खुळे, चंदाबाई गवळी, माधुरी गवळी, सुनीता गोसावी, कल्पना जैन, लताबाई क्षीरसागर, लिलाबाई धोंगडे, वंदना गवळी, प्रणिता वायकोस, सुरेखा बाई घोडके, कल्पनाबाई बुजुर्गे, अनिता वायकोस, कल्पना खुळे आदी महिला सक्रिय भक्ती भावाने सहभाग नोंदवून पूजन केले. सकाळी भगवंताचा अभिषेक शांति मंत्र व सिद्ध चक्र विधान . संगीतमय विधान पूजन पंडित रामदास चतुर यांच्या संगीत ध्वनीने संपन्न करण्यात येत आहे विधान यशस्वी करण्यासाठी मंदिर अध्यक्ष बाहुबली वायकोस, सचिन शिरसागर, जयकुमार वायकोस ,शुभम घोडके, सुभाष क्षीरसागर, रमेश काळे आधी परिश्रम घेत आहे. अशी माहिती नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यानी दिली.

# अण्णाभाऊ साठे जयंती त्यांच्या साहित्य पुस्तकाच्या मुखपृष्ठ चित्र प्रदर्शनीचे वैजापूरकराना मिरवणुकीने दर्शन



वैजापूर, दि. ३ (प्रतिनिधी) – साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची ओळख वैजापूरकराना व्हावी म्हणून सकल मातंग समाज जयंती उत्सव समितीने डॉ.अण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेल्या कादंबरी, पोवाडे, शाहिरी व अन्य पुस्तकांच्या मुखपृष्ठाचे फोटो काढून हे साहित्य चित्ररथाद्वारे ट्रॅक्टर वर मागे लावून शनिवार रोजी सायंकाळी अण्णाभाऊसाठे नगर येथून मिरवणूक काढली, वैजापूरकर याना अण्णाभाऊ साठे यांच्या सहित्याची ओळख व जाणीव करून दिली.

'आधी नमन माझे शिवराया' असे वाक्य लिहून छत्रपती शिवाजी महाराज, लहुजी वस्ताद व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, व लेखणी हाती घेऊन साहित्य लिहित असलेले अण्णाभाऊ साठे हे चित्र वैजापूर करांच्या मनी भावले. या साहित्य चित्र प्रदर्शनी रथाचे उदघाटन पोलीस निरीक्षक सत्यजित ताईतवाले व जेष्ठ साहित्यिक धोंडीराम सिंह राजपूत यांनी श्रीफळ वाहून केले.

सर्वांचे लक्ष अण्णाभाऊंच्या साहित्य कृती कडे वेधणारी ही मिरवणूक वैजापूर इतिहासात पहिलीच आहे, असे उदगार मराठवाडा विभागाचे जेष्ठ बालसाहित्यिक व लेखक धोंडीरामसिंह राजपूत यांनी या प्रसंगी व्यक्त करून अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे सर्वश्री राहूल कारभारी त्रिभुवन, देवदास त्रिभुवन, संकेत त्रिभुवन, तुषार त्रिभुवन, सागर त्रिभुवन, सोनू त्रिभुवन, प्रवीण त्रिभुवन, रोहित त्रिभुवन, देवा त्रिभुवन, आदित्य त्रिभुवन, अविनाश सोळसे,श्री, खुडे या सर्वांचे अभिनंदन करून सत्कार केला.

# वडोद कान्होबा शाळेमध्ये साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी



छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) – १ ऑगस्ट शनिवारी न्यू हायस्कूल वडोद कान्होबा या शाळेमध्ये साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती निकम मॅडम व प्रमुख पाहुणे म्हणून श्री शिंदे सर हे उपस्थित होते.

सर्वप्रथम कार्यक्रमाची सुरुवात अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली.

यावेळी इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या बद्दल आपले मनोगत व्यक्त केले व विविध गीते सादर केली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री शिंदे सर यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारे भाषण केले.यानंतर शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती निकम मॅडम यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांची शिक्षणाविषयी असलेली विविध उदाहरणे देऊन शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

अशा प्रकारे उत्साह पूर्ण वातावरणात कार्यक्रम पार पडला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्ग सातवीतील कु. सेजल चव्हाण व कु. विजया चव्हाण यांनी केले तर आभार कु.अमृता देवकर हिने मानलेत.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री ए.आर.शार्दुल सर यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री साळुंके सर, श्री पडवाळ सर, श्री चौधरी सर, श्रीमती जाधव मॅडम श्रीमती थोटे मॅडम तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# मैत्री ही मैत्रीच असतेः तिच्यापेक्षा सुंदर दुसरे कोणतेही नाते नसते

छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) – आपल्याला अनेक मित्रमैत्रिणी असतात. शाळा मित्र, कॉलेज मित्र, क्लास मित्र जीम मित्र, कीटि मित्र आता तर फेसबुक आणि ईस्टागाम वरसुद्धा असंख्य ओळखी निर्माण होतात. त्यांनाही आपण मित्र म्हणतो. आपल्या अनेक मित्र पैकी काही जणांना आपण बेस्ट मित्र मानतो. एखादी अशी व्यक्ती असते ज्याच्याशी आपण आपल्या मनातील दुःख, सुख, भावना आणि गुपिते शेअर करू शकतो. आपल्या आयुष्यातील ती व्यक्ती आपल्याला खूप जवळची वाटते आणि आपण तिला बेस्ट मित्र समजतो.

पण मुळात आपण आपल्या मित्र मध्ये असा भेदभाव का करतो? हा माझा मित्र आहे, हा माझा Bestie आहे कशाला? ही गोष्ट सोडली तर मजाच काय, असेही काहींना वाटेल. पण जर आपण आपल्या सगळ्याच मित्रा ला बेस्ट मित्र मानलं, तर आपला तोटा होणार का? शेवटी मैत्री ही मैत्रीच असतेः तिच्यापेक्षा सुंदर दुसरे कोणतेही नाते नसते. तिला असे Categorized करण्याचा प्रयत्नच कशाला?

–रचना पहाडे

# भारताचा पॉलिमर नोटांच्या युगात प्रवेश

**रिझर्व** बँक ऑफ इंडिया ने नुकत्याच घेतलेल्या निर्णयानुसार प्लास्टिकच्या नोटांची प्रायोगिक तत्त्वावर छपाई लवकरच सुरू होणार आहे. रिझर्व बँक ऑफ इंडियाला, आर.बी.आय ॲक्ट १९३४,कलम २५ नुसार असलेल्या अधिकारा अंतर्गत हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) प्रायोगिक तत्त्वावर सध्या फक्त दहा आणि वीस रुपयांच्या पॉलिमर नोटांची सध्या निर्मिती करण्यात येणार आहे.

सुरुवातीच्या काळात दोन अब्ज नोटा छापण्यात येतील. देशातील सर्व क्षेत्रीय भागातून या नोटांची चाचणी घेण्यात येईल.

२) या नोटांची निर्मिती झाल्यानंतर सध्याच्या अस्तित्वात असलेल्या कागदी नोटाही कायदेशीर चलन म्हणून अस्तित्वात राहतील.

३) जगात सध्या ६० देशांमध्ये पॉलिमर नोटांचा वापर करण्यात येतो. नव्या निर्णयामुळे भारताचा समावेश या देशांमध्ये होईल.

४) या नोटांच्या निर्मिती सोबतच देशातील सर्व एटीएम मध्ये आवश्यकतेप्रमाणे तांत्रिक बदल करण्यात येईल.

प्लास्टिक/ पॉलिमर च्या नोटांच्यामुळे काही फायदे होतील. त्याचा तपशील पुढील प्रमाणे.

**पॉलिमर नोटांचे फायदे –**

१) या नोटांचे आयुष्य सध्याच्या कागदी नोटांपेक्षा चार ते पाच पट जास्त आहे. कागदी नोट वापरल्यामुळे साधारण एका वर्षात खराब होते. पॉलीमरच्या नोटांचे आयुष्य साधारण चार ते पाच वर्षाचे आहे.

नोटांच्या निर्मिती खर्चात यामुळे मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे.

२) कागदी नोटांप्रमाणे या नोटा भिजणार नाहीत, चुरगळणार नाहीत.

३) गरजेप्रमाणे या नोटा धुता येतील. कोरोनाच्या काळात कागदी नोटांमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले होते, पॉलिमर नोटांमुळे या प्रश्नांची सोडवणूक होईल.

४) बनावट नोटांची छपाई जवळजवळ अशक्य होईल. ज्या देशांमध्ये पॉलिमर नोटा छापल्या गेल्या आहेत त्या देशांमध्ये बनावट नोटांचे प्रमाण कमी झाल्याचा इतिहास आहे.

५) फाटलेल्या, खराब झालेल्या नोटा गोळा करून त्या नष्ट करणे, तेवढ्या नवीन नोटा छापणे हे सध्या केले जाते. रिझर्व बँकेला यासाठी मोठा खर्च करावा लागतो. या खर्चातून आता कायमची मुक्ती होईल.

पॉलिमर नोटांच्या संदर्भात अन्य माहिती पुढील प्रमाणे.

२०२६ यावर्ष अखेर या नोटा चलनात येतील असा प्राथमिक अंदाज आहे. या नोटांच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेली निविदा प्रक्रिया सुरू झालेली आहे.

मागील वर्ष अखेर रिझर्व बँक ऑफ इंडिया ने देशातील नोटा छापाईसाठी ४८७५ कोटी रुपयांचा खर्च केला आहे. या खर्चात काही प्रमाणात तरी बचत होईल.

मार्च २०२६ अखेर देशभरामध्ये सर्व प्रकारच्या ४१.२३ लाख कोटी रुपयांच्या नोटा चलनात आहेत. या आकड्यावरून देशात नोटांचा किती मोठ्या प्रमाणात वापर आहे हा अंदाज येऊ शकेल. रिझर्व बँकेच्या क्लीन नोट पॉलिसी अंतर्गत चांगल्या नोटा चलनात असाव्यात, खराब, फाटक्या, जीर्ण नोटा चलनात नसाव्यात असा रिझर्व बँकेचा कायम प्रयत्न असतो. या प्रयत्नाचा पुढील भाग पॉलिमर नोटांची निर्मिती हा आहे. सर्व सामान्यांना रोज हाताळाव्या लागणाऱ्या पैशयाच्या काळजी पोटी हा निर्णय घेण्यात आला आहे. या नोटा चलनात आल्यानंतर एका नव्या युगात आपण प्रवेश करणार आहोत.

**– डॉ. अभय मंडलिक**

लेखक बँकिंगचे अभ्यासक आहेत

# क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) – थोर स्वातंत्र्यसैनानी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांना अभिवादन करण्यात आले. उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) संगीता राठोड यांच्या हस्ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगीजिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) – छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने आज क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंती निम्मित अभिवादन करण्यात आले.मनपा मुख्यालय येथे मा.आयुक्त श्री.अमोल येडगे यांच्या हस्ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त ०२ कल्पिता पिंपळे,मुख्य लेखा परीक्षक शिवाजी नाईकवाडे, उप आयुक्त अपर्णा थेटे,अभय प्रामाणिक, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ उज्वला भामरे, कार्यकारी अभियंता बाळासाहेब शिरसाट,सहायक आयुक्त रमेश मोरे, अनिल बोंडे, माहिती व जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद, रविंद्र खरात, अतुल बनकर, संतोष कोठाळे, अजित बुळे आदींची उपस्थिती होती.

# बेवारस मृतदेह, ओळख पटविण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) – येथील रेल्वेस्टेशन तिकिट बुकिंग कार्यालयाजवळ ६: ३० सुमारास अनोळखी इसम बेशुद्ध अवस्थेत आढळुन आला. त्यास घाटी रुग्णालयात दाखल केले असता त्यास मृत घोषीत करण्यात आले. मयत इसम हा अनोळखी असून त्याची ओळख पटविण्याचे आवाहन वेदांत नगर पोलीस स्टेशनचे तपासी अंमलदार पी.जे.चोपडे यांनी केले आहे.

मयताचे वर्णनः वय अंदाजे २५ वर्षे, रंग गोरा, नाक सरळ, डोळे काळे, केस काळे बारीक, चेहरा लांबट, अंगात कपडे– हिरवा रंगाचा शर्ट व राखाडी रंगाची पॅंन्ट वरील वर्णनाच्या इसमाबाबत काही माहिती कळाल्यास वेदांत नगर पोलीस स्टेशनचे हवालदार पी.जे.चोपडे यांच्याशी ७७२२००८६९४ अथवा ०२४०–२३५१३३३ वर संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

# सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य रुग्ण व निराधारांच्या सेवेसाठी समर्पित करणार : प्रकाश नाईक

## गटविकास अधिकारी प्रकाश नाईक यांचा भव्य सेवापूर्ती सोहळा संपन्न

खुलताबाद, दि. ३ (प्रतिनिधी) – सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य रुग्ण व निराधारांच्या सेवेसाठी समर्पित करणार असल्याचे प्रतिपादन खुलताबाद पंचायत समितीचे निवृत्त गटविकास अधिकारी प्रकाश नाईक यांनी केले.

सेवानिवृत्तीनंतर सेवाव्रती म्हणून रुग्णसेवा आणि निराधारांची सेवा करण्याचा समाजोपयोगी निर्णय घेतला आहे. जीवनाचा हा उत्तरकाळ समाजसेवेसाठी समर्पित केल्याने मनाला आणि शरीराला एक नवी ऊर्जा मिळते,ङ्ख असे भावोद्गार गटविकास अधिकारी प्रकाश नाईक यांनी काढले. आपल्या भविष्यातील नियोजनाबद्दल बोलताना त्यांनी समाजसेवेचा संकल्प जाहीर केला.

जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश गलांडे पाटील यांच्या हस्ते गटविकास अधिकारी प्रकाश नाईक यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश गलांडे पाटील यांनी सेवानिवृत्त निरोगी दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम समितीचे सभापती सचिन गरड, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक संदीप निकम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रहार ढोकणे, वैजापूर चे गटविकास अधिकारी ज्ञानदेव जायभाये, गंगापूरचे गटविकास अधिकारी वाघचौरे, कन्नड चे गटविकास अधिकारी ओमप्रकाश रामावत, गटशिक्षणाधिकारी श्रद्धा ताटे, दीपक बागुल, प्रतिभा कांबळे आदी उपस्थित होते.

गटविकास अधिकारी प्रकाश नाईक यांचा सेवापूर्ती सोहळा अत्यंत उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात पार पडला. या सोहळ्याला त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रमंडळी तसेच विविध कार्यालयांमध्ये त्यांच्यासोबत काम केलेले आजी–माजी अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी गटविकास अधिकारी प्रकाश नाईक यांच्या यशस्वी, निष्कलंक आणि कर्तव्यदक्ष कार्यकाळाचे कौतुक केले. अनेक सहकाऱ्यांनी त्यांच्या प्रशासकीय कौशल्याच्या आणि संवेदनशील स्वभावाच्या जुन्या आठवणींना उजाळा देत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रकाश नाईक यांनी शासकीय सेवेत देगलूर, बिलोली, सोयगाव, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, खुलताबाद येथे कार्यरत असतांना नेहमीच तळागाळातील जनसामान्यांच्या हिताला प्राधान्य दिले आणि आता उर्वरित आयुष्यही ते रुग्ण व वंचितांच्या सेवेसाठी लावणार असल्याने उपस्थित सर्वांनी त्यांच्या या उदात्त निर्णयाचे टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रिया साळुंके यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रकाश नाईक यांनी आभार मानले.

# कृषिपंपांना दिवसा वीजपुरवठ्यासाठी वाहिनी विलगीकरणाची कामे वेगाने करा

## महावितरणचे संचालक (संचालन) श्री.धनंजय औंढेकर यांचे निर्देश



छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) – राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा शाश्वत वीजपुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत कृषी वाहिनी विलगीकरणाची कामे वेगाने करा. तसेच स्मार्ट मीटरबाबत ग्राहकांचे शंकानिरसन तसेच ग्राहक मेळावे घेऊन प्रबोधन करा, असे निर्देश महावितरणचे संचालक (संचालन) श्री.धनंजय औंढेकर यांनी दिले.

महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलाच्या शनिवारी (१ ऑगस्ट) झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य अभियंता श्री.दीपक कुमठेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी श्री.औंढेकर म्हणाले की, राज्य शासनाने शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना–२.० ही महत्त्वाकांक्षी योजना आणलेली आहे. तसेच राज्यात ६.९३ लाख ग्राहकांनी उभारलेल्या छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पांतून ५ हजार ६०० मेगावॅट वीज तयार होते.

येत्या दोन ते तीन महिन्यांत ही क्षमता सात हजार मेगावॅटवर जाईल. तसेच ११ लाख सौर कृषिपंपांद्वारे ३ हजार मेगावॅट वीज निर्माण होत आहे. सर्व सौर प्रकल्पांतून निर्माण होणारी वीज कृषिपंपांना सकाळी ९ ते ५ या वेळेत पुरवली जाते. मात्र अनेक ठिकाणी कृषी वाहिनी विलगीकरणाअभावी दिवसा वीज पुरवण्यात अडचणी येत आहेत. त्यासाठी सर्व कार्यकारी अभियंते व उपविभागीय अभियंत्यांनी स्वत: लक्ष घालून ही कामे वेगाने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत. या कामात कसलीही हयगय खपवून घेतली जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश श्री.औंढेकर यांनी दिले.

छत्रपती संभाजीनगर परिमंडलात वीजबिल थकबाकी वसूल करण्यासाठी जोमाने प्रयत्न करा. ग्राहकांना अचूक वीजबिले मिळतील याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. चुकीची वीजबिले वेळेत दुरुस्त करून ग्राहकांना ती भरण्यास प्रवृत्त करावे. स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप (स्मार्ट) योजनेत दारिद्र्यरेषेखालील व दुर्बल घटकातील ग्राहकांना १ किलोवॅट क्षमतेचा सौरसंच अल्प खर्चात बसवण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांना प्रोत्साहित करा. परिमंडलातील वीजगळती कमी करण्यासाठी वीजचोरी पकडण्याची मोहीम राबवा, असे निर्देशही श्री.औंढेकर यांनी दिले. वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करा. त्यासाठी आवश्यक ती साधनसामग्री मुख्यालयाकडून दिली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

बैठकीस अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, युवराज जरग, गोरक्षनाथ सपकाळे, बीना सावंत, महेश पवार, शुभांगी कटकधोंड, प्रभारी महाव्यवस्थापक प्रवीण गायकवाड, प्रभारी सहायक महाव्यवस्थापक शंकर कुलकर्णी यांच्यासह सर्व कार्यकारी अभियंते, उपविभागीय अभियंते, लेखा विभागाचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# पदापेक्षा माणुसकी मोठी! विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी जपली श्रमप्रतिष्ठा; माणुसकीचे प्रेरणादायी दर्शन

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- स्वच्छ भारत अभियान ही केवळ सरकारी योजना नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी दिवस-रात्र मेहनत घेणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांचे योगदान अमूल्य आहे. त्यांच्या अथक परिश्रमामुळेच सार्वजनिक ठिकाणे आणि परिसर स्वच्छ राहतात.

२ ऑगस्ट रोजी पी. एस. महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या मॅरेथॉन स्पर्धेनंतर घडलेली एक घटना अनेकांसाठी प्रेरणादायी ठरली. स्पर्धा संपल्यानंतर बहुतांश जण छायाचित्रे आणि सेल्फी घेण्यात व्यस्त होते. मात्र, मैदानाच्या एका कोपऱ्यात काही स्वच्छता कर्मचारी शांतपणे प्लास्टिक आणि कचरा गोळा करत होते.

याच वेळी छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांची नजर त्या स्वच्छता सेविकांकडे गेली. कोणताही औपचारिकपणा न दाखवता त्यांनी थेट त्या कर्मचाऱ्यांजवळ जाऊन त्यांच्या कामाचे कौतुक केले. त्यांनी कर्मचाऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आणि त्यांच्यासोबत छायाचित्रही काढले.

या साध्या पण अर्थपूर्ण कृतीतून 'पदापेक्षा माणुसकी मोठी' आणि 'श्रमाचा सन्मान हीच खरी श्रमप्रतिष्ठा' हा महत्त्वाचा संदेश समाजासमोर आला.

स्वच्छता कर्मचारी, घंटागाडीवरील कामगार आणि सार्वजनिक सेवेत कार्यरत असलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या श्रमांचा आदर करणे ही समाजाची जबाबदारी आहे. स्वच्छ भारताचे स्वप्न केवळ हातात झाडू घेऊन पूर्ण होणार नाही, तर प्रत्येक श्रमिकाचा सन्मान आणि त्यांच्या योगदानाची जाणीव ठेवली, तरच खऱ्या अर्थाने स्वच्छ आणि संवेदनशील समाज घडू शकेल.

'स्वच्छ शहरासाठी श्रमिकांचा सन्मान करूया' हा संदेश या प्रसंगातून अधोरेखित झाला आहे.



# राजस्थान प्रकोष्ठ तर्फे मैत्री दिवस साजरा



छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- भारतीय जनता पार्टी राजस्थान प्रकोष्ठाच्या वतीने हॉटेल कृष्णा इन येथे जागतिक मित्रता दिवस उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमात सर्व पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी राजस्थानी पगडी परिधान करून एकमेकांना फ्रेंडशिप बँड बांधत मैत्रीचे बंध अधिक दृढ केले. यानंतर विविध मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले. तसेच 'तेरे जैसा यार कहाँ', 'एहसान मेरे दिल पे तुम्हारा है दोस्तों', 'बंबई से आया मेरा दोस्त' यांसारख्या मैत्रीवरील लोकप्रिय गीतांवर उपस्थितांनी मनमुराद आनंद लुटत ठेका धरला. संपूर्ण कार्यक्रम मैत्री, स्नेह आणि आनंदाच्या वातावरणात पार पडला.

उपस्थितांसाठी अल्पोपहाराचीही व्यवस्था करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी अनेकांनी मित्रता दिनानिमित्त आपल्या भावना व्यक्त केल्या. तसेच विविध मनोरंजनात्मक स्पर्धांमधील विजेत्यांचा पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी राजस्थान प्रकोष्ठाचे अध्यक्ष संजय मंत्री, सरचिटणीस अभिषेक कयाल, सोमनाथ तांबी, उपाध्यक्ष अरुण राठी, सीए सी. एम. शर्मा, पदमसिंह राजपुरोहित, कमल वर्मा, विपिन गुजराणी, पुनमचंद सुराणा, रामलाल दायमा, योगेश भाटी, सागर पांडे, दिनेश दरख, महावीर लोहाडे, सुदर्शन जाजू, नितीन तोतला, निलेश मित्तल, हरिओम राठोड, जयप्रकाश खंडेलवाल, दीपक फुलबाती, शैलेश राठोड, संजय दरख, जगदीश उपाध्याय, सागर राठोड, अमोल चौहाण आदी पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सरचिटणीस सोमनाथ तांबी यांनी पुढाकार घेतला. तसेच पुनमचंद सुराणा, रामलाल दायमा, दिनेश दरख, पदमसिंह राजपुरोहित, विपिन गुजराणी आणि योगेश भाटी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# प्रवीण टाके छत्रपती संभाजीनगरच्या माहिती उपसंचालक पदावर रूजू

छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) – माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाचे उपसंचालक प्रवीण टाके यांनी सोमवारी छत्रपती संभाजीनगर विभागाचे माहिती उपसंचालक या पदाचा कार्यभार स्वीकारला.



प्रवीण टाके यापूर्वी कोल्हापूर येथे उपसंचालक म्हणून कार्यरत होते. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात २००८ ला रुजू झाल्यानंतर त्यांनी नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्रात जनसंपर्क अधिकारी म्हणून काम केले आहे. त्यानंतर मुंबई मंत्रालयात वरिष्ठ सहायक संचालक असताना 'लोकराज्य'चे ते कार्यकारी संपादक होते.

चंद्रपूर, नागपूर व नांदेड याठिकाणी त्यांनी जिल्हा माहिती अधिकारी पदावर कार्य केले आहे. शासन सेवेत केलेल्या उल्लेखनीय कामासाठी त्यांना सन २०१९ – २० वर्षाचा यशवंतराव चव्हाण उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला आहे.

पत्रकारितेतील स्नातकोत्तर पदवी प्राप्त असलेले प्रवीण टाके यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा स्व.वसंतराव ओगले पुरस्कार प्राप्त आहे. शासनात येण्यापूर्वी त्यांनी जवळपास १४ वर्ष नागपूर पत्रिका, तरुण भारत, सामना आणि लोकमत वृत्तपत्रात विविध पदावर कार्य केले आहे. त्यांची फकीर ही चरित्र कादंबरी प्रकाशित झाली आहे.

वऱ्हाडी भाषेतील स्तंभकार, कवी, लेखक म्हणून त्यांची ओळख असून विविध सामाजिक विषयावर त्यांनी विपुल लेखन केले आहे. आज विभागीय माहिती कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी येथील जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने अधिकारी,कर्मचा-यांनी त्यांचे स्वागत केले.

# अण्णाभाऊ साठे यांनी साहित्याला समाज परिवर्तनाची धार दिली- डॉ. बाळासाहेब लिहिणार



करमाड, दि. ३ (प्रतिनिधी) – साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे केवळ साहित्यिक नव्हते, तर अन्यायाविरुद्ध आवाज उठविणारे क्रांतिवीर होते. त्यांच्या साहित्याने उपेक्षित समाजाला स्वाभिमानाची जाणीव करून दिली तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला सांस्कृतिक बळ मिळवून दिले, असे प्रतिपादन मराठी विभागप्रमुख डॉ. बाळासाहेब लिहिणार यांनी केले.

राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, करमाड येथे मराठी विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सदाशिव मुळे होते.

डॉ. लिहिणार यांनी 'लाल बावटा' कलापथक, लोकनाट्य चळवळ, संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील योगदान आणि अण्णाभाऊंच्या साहित्याचे सामाजिक महत्त्व यावर सविस्तर विवेचन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. सदाशिव मुळे यांनी विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊंच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले.

प्रास्ताविक डॉ. सुखदेव पोटदुखे यांनी, सूत्रसंचालन प्रा. प्रकाश बांगर यांनी तर आभार डॉ. नितीन मुळे यांनी मानले. कार्यक्रमासाठी डॉ. अश्विनीकुमार चिंचोलीकर, डॉ. नरेश डहाळे, प्रा मनोज देवकर डॉ. जयश्री पाटील, प्रा. योगेश शिंदे, डॉ. नानासाहेब लावंड, डॉ. ललित गोल्डे, प्रा. प्रशांत माटे, डॉ. इम्रान पठाण, डॉ. लक्ष्मण खरात, प्रा. तन्मय भावसार, डॉ. किशोर काळे तसेच शिक्षकेतर कर्मचारी भगवंत देशपांडे, रमेश जाधव, कैलास जाधव, श्रीमती हेमा जोशी, अलका कुलकर्णी, सुनीता पारेकर, मधुकर राठोड, ज्ञानेश्वर जाधव आदींसह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकशाही दिनी २१ अर्ज दाखल

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजीत केला जातो. आज जिल्हास्तरीय लोकशाही दिन जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडला. यावेळी विविध विभागांचे मिळून २१ तक्रारी अर्ज दाखल झाले. त्याचा तपशिल याप्रमाणे- महसूल ०३ आणि इतर साधे निवेदन १८ असे एकूण २१ अर्ज दाखल झाले,असे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सामान्य प्रशासन विभागाने कळविले आहे.


## महावीर शिक्षण प्रसारक मंडळ

संचलित

**अपंग (अस्थिव्यंग) निवासी विद्यालय, व ओंकार मुकबधीर निवासी विद्यालय**

**ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर**

**पाहिजेत**

| अ.क्र. | उपक्रम / शाळेचे नाव | पदनाम | जागा | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | अपंग (अस्थिव्यंग) निवासी विद्यालय | वसतिगृह अधीक्षक | ०१ | कोणत्याही शाखेचा पदवीधर व डी, एड. |
| २ | ओंकार मुकबधीर निवासी विद्यालय | सफाईगार | ०१ | इयत्ता चौथी उत्तीर्ण |

अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त शासन मान्य अनुदानित शाळेवर रिक्त झालेल्या पदावर वरील जागा भरणे आहेत. मुलाखतीस स्वखर्चाने मूळ कागदपत्रासह दि.१२/०८/२०२६, वार बुधवार रोजी सकाळी १०:०० ते संध्याकाळी ४:०० वाजेपर्यंत अपंग (अस्थिव्यंग) निवासी विद्यालय, पैठण व ओंकार मुकबधीर निवासी विद्यालय ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर येथे मुलाखतीस हजर राहावे


# मराठा क्रांती मोर्चा ९ ऑगस्टच्या पार्श्वभूमीवर क्रांती चौकातील उपोषणावर ठाम!

**मराठवाड्यात हैदराबाद गॅझेटियर लागु आहे किंवा नाही या बाबतीत सरकारने भुमिका स्पष्ट करावी**

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत टिकणारे आणि शाश्वत आरक्षण मिळावे, या प्रमुख मागणीसाठी येत्या ९ ऑगस्टपासून क्रांती चौक येथे बेमुदत उपोषण करण्या च्या निर्णयावर मराठा क्रांती मोर्चा ठाम असल्याचे रविवारी सिडकोतील एन–३ येथील शिवछत्रपती महाविद्यालयात झालेल्या बैठकीत स्पष्ट करण्यात आले.यासाठी गेल्या महिना भरापासून जिल्ह्यातील गावोगावी दौरे सुरू असून बैठका घेण्यात येत आहे.सदरील उपोषणाबाबतीत प्रशासनाला १५ दिवसा पूर्वीच परवानगी बाबतीत निवेदन देण्यात आले होते.परवानगी मिळो अथवा न मिळो, आंदोलन नियोजीत तारखे पासून सुरूच राहील,असा निर्धार उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

बैठकीत मराठा समाजाला सध्या मिळालेले एस.ई.बी.सी. आरक्षण टिकवण्यासाठी सरकार कोर्टात सकारात्मक भुमिका घेत नसल्यामुळे निकालच विरोधात जाण्याची स्थिती निर्माण झालेली असतानाही शासन मुग गिळून बसले असुन या मुळे सदरील आरक्षण प्रकरण धोक्यात आलेले असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. तसेच गायकवाड आयोगाच्या माध्यमातून शिफारशी स्वीकारून देण्यात एस.इ बी.सी. आरक्षण बाबतीत न्यायालयात सरकारने तातडीने राज्य सरकारच्या वतीने क्युरिटिव्ह पिटिशन मध्ये त्रुटींची पुर्तता करण्यासाठी आवश्यक पावले उचलली नाहीत तर हे सर्वोच्च न्यायालयातील प्रकरण सुद्धा धोक्याचा उंबरठा ओलांडल्या शिवाय राहणार नाही.

हैदराबाद गॅझेटियर नोंदीच्या नावाखाली काढण्यात आलेल्या शासन निर्णयामुळे समाजात संभ्रम निर्माण झाला असून मराठा समाजा ची सभ्रमावस्था वाढत चालली असल्याचा बाब या बैठकीत सर्वांनीच पुढे आणली आहे. उपस्थित पदाधिकाऱ्यांनी सांगितले की,मराठवाड्यातील अनेक मराठा बांधवांनी २ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णया नुसार हैदराबाद गॅझेटियर नोंदीच्या आधारे सरसकट मराठवाड्यातील मराठा समाजाला जात प्रमाणपत्र मिळाणार असे शासनाच्या वक्ताव्यामुळे समाजातील बांधवांनी अर्ज केले, मात्र नोंदी व वंशावळ जुळत नसल्याच्या कारणा वरून अनेकांचे अर्ज फेटाळण्यात आले. त्यामुळे संबंधित शासन निर्णय प्रत्यक्षात लागू होत नसल्याचे स्पष्ट झाल्याचा दावा बैठकीत करण्यात आला.त्यामुळे कायदेशीर आणि घटनात्मक दृष्ट्या टिकणाऱ्या आरक्षणा साठी नव्याने संघटित लढा उभारण्याची गरज असल्याचेही मत अनेक मान्यवरांनी व्यक्त केले. छत्रपती संभाजीनगर ही मराठा क्रांती मोर्चाची जन्मभूमी असून, शांततेच्या मार्गाने लाखोंचे मोर्चे काढण्याचा आदर्श या जिल्ह्याने देशासमोर ठेवला आहे.त्याच परंपरे तून आरक्षणाच्या लढ्याला नवी दिशा देण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

बैठकीत मराठा समाजा समोरील सामाजीक, शैक्षणिक, आर्थिक आणि संघटनात्मक प्रश्नांवर तसेच आरक्षणा च्या सद्यस्थितीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी पुढील प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचा व्याज परतावा,सारथी संस्थेच्या बंद पडलेल्या व नव्याने समाविष्ट होणाऱ्या योजनां बाबत तातडीने निर्णय घेणे,मराठाआंदोलना दरम्यान दाखल झालेले सरसकट गुन्हे तातडीने मागे घेणे,राज्यातील आत्महत्या केलेल्या शेतकरी व मराठा कुटुंबांना आर्थिक मदत देऊन कुटुंबा तील एका सदस्याला स्थानिक स्वराज्य संस्थेत नोकरीची संधी देणे, केवळ आंदोलन करून न थांबता, समाजाच्या मागण्यांसाठी विधिमंडळ, संसद आणि न्यायालयीन पातळी वरही प्रभावी घटनात्मक व कायदेशीर लढा उभारण्याची प्रचंड मोठी अशी आवश्यकता असल्याचे मत अनेक वक्त्यांनी व्यक्त केले. आरक्षणासंदर्भात समाजात निर्माण झालेला संभ्रम दूर करण्यासाठी हैद्राबाद गॅझेटियर,एस.ई.बी.सी. आरक्षणा बाबत एकत्रित रित्या भूमिका मांडून समाजाला निर्माण झालेली वस्तुस्थिती स्पष्ट करुन समाजातील संभ्रम दुर करण्याचे आवाहन मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने करण्यात आले.

दरम्यान ९ ऑगस्ट पासूनच्या बेमुदत उपोषणासाठी क्रांतीचौकात परवानगी मिळावी यासाठी सोमवारी मराठा क्रांती मोर्चाचे पदाधिकारी पोलीस आयुक्तांची भेट घेणार असून,परवानगी बाबत पुढील भूमिका निश्चित करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

(पान १ वरुन)

## बिहारमध्ये भाजपाला धक्का!...

झाली होती. गेल्या ३० वर्षांपासून बांकीपूर हक्काची जागा मानली जात होती. दरम्यान, प्रशांत किशोर यांनी याला छेद देत मोठा विजय मिळवला आहे.

बांकीपूर पोटनिवडणुकीच्या मतमोजणीला आज सकाळी आठ वाजता सुरुवात झाली. मतमोजणीसाठी कडेकोट सुरक्षा व्यवस्था करण्यात आली होती. ३६ फेऱ्यांनंतर मतमोजणी पूर्ण झाली आहे. ३० जुलै रोजी झालेल्या या पोटनिवडणुकीत ३४.३० टक्के मतदान झाले होते. यावेळी एकूण २६ उमेदवार रिंगणात होते.

## नीट पेपरफुटी आंदोलनाच्या..

जेन अल्फा विद्यार्थ्यांशी संवाद साधतील.

आयआयएमयुएन २०११ पासून कार्यरत असलेली तरुणांची मोठी संस्था आहे. ही संस्था शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्व, राजकीय, सामाजिक नेतृत्वगुण वाढवण्याचे काम करते. यामध्ये विद्यार्थी विविध देशांचे प्रतिनिधी (डिप्लोमॅट) बनून संयुक्त राष्ट्रसंघाच्या धर्तीवर स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय समस्यांवर एकत्र येऊन चर्चा करतात आणि त्यावर उपाय शोधतात. संस्थेच्या सल्लागार मंडळात उद्योगपती अजय पिरामल, दीपक पारेख, नादिर गोदरेज, काँग्रेसचे खासदार शशी थरूर, भारताचे माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड, चित्रपट निर्माते करण जोहर, लष्कर, नौदल आणि हवाई दलाचे माजी प्रमुख तसेच माजी ऑलिम्पियन पी. टी. उषा यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा समावेश आहे.

## सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशांची..

न्यायालय (सुधारणा) विधेयक, २०२६ चर्चेसाठी आणि मंजुरीसाठी सादर केले.

यावेळी काँग्रेस, समाजवादी पक्ष यासह विरोधी पक्षांचे खासदार राम मंदिरातील देणगी चोरी आणि दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील पोलीस कारवाईच्या मुद्द्यावरून घोषणाबाजी करत राहिले. गोंधळातच हे विधेयक आवाजी मताने मंजूर झाले. यामुळे सर्वोच्च न्यायालयात भारताच्या सरन्यायाधीशांसह एकूण न्यायाधीशांची संख्या ३४ वरून ३८ झाली आहे. त्यानंतर लोकसभेचे कामकाज मंगळवारी सकाळी ११ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

## आधी मोदींना त्यांची डिग्री...

डिलिट केली जातात. राजकारणावरुन लोकांचा पूर्ण विश्वास उडाला आहे. सकाळी लोक मतं एकाला देतात, आणि संध्याकाळी सरकार वेगळ्याच पक्षाचे येते. सकाळी जनता एक आमदार, खासदार एक निवडते आणि संध्याकाळी ते दुसऱ्या पक्षात जातात. जिथे ईडी, सीबीआय पाठवून पक्ष तोडण्यात येतात, निवडणूक हायजॅक केली जातात, तिकडे राजकीय पक्ष स्थापन करुन काय करायचे आहे, असा सवाल अभिजीत दिपके यांनी उपस्थित केला.


SHRIRAM Asset Reconstruction

## श्रीराम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (एसएआरसी)

**( विविध एसएआरपीएल ट्रस्टचे विश्वस्त म्हणून काम करत आहे )**

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीराम हाऊस, क्रमांक ४, बुर्किट रोड, टी. नगर, चेन्नई – ६०००१७. **कॉर्पोरेट कार्यालय:** युनिट क्रमांक एफएफ-ए-०५, ए विंग, पहिला मजला, आर्टगिल्ड हाऊस, फिनिक्स मार्केट सिटी, एलबीएस मार्ग, कुर्ला (पश्चिम), मुंबई-४०००७०, **फोन क्रमांक**-१८०० १२० २३८९; contact@truhomefinance.in

### सार्वजनिक सूचना: स्थावर मालमत्तेची ई-लिलाव-सह-विक्री सूचना

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अधिनियम, २००२ तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ मधील नियम ६, ८(६) व ९ तसेच परिशिष्ट–IV-A मधील तरतुदींनुसार स्थावर मालमत्तेच्या ई-लिलाव विक्रीची सूचना.**

सर्व सामान्य जनतेस व विशेषतः कर्जदार, तारणकर्ता / कर्ते आणि जामीनदाराना येथे सूचना देण्यात येत आहे कि, खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता ज्या सुरक्षित कर्जदाराकडे गहाण ठेवल्या आहेत/ आकारल्या आहेत, आता **श्रीराम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड**, विविध SARPL ट्रस्टच्या विश्वस्त म्हणून काम करत आहेत [नोंदणीकृत असाइनमेंट करारांद्वारे आर्थिक मालमत्तेच्या असाइनमेंटनुसार] SARFAEI कायद्याच्या कलम (5) अंतर्गत, खाली नमूद केलेल्या कर्जदारांसह विविध कर्जदारांशी संबंधित आर्थिक मालमत्ता, मूळ कर्जदाता/नियुक्तकर्ता टूहोम फायनान्स लिमिटेड **(पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)** कडून, त्याद्वारे निर्माण केलेल्या अंतर्निहित सुरक्षा हितासह, त्यावरील सर्व हक्क, मालकी आणि व्याजासह, मिळवले आहे. ज्याचा प्रत्यक्ष ताबा मूळ कर्जदाता/नियुक्तकर्ता/श्रीराम मालमत्ता पुनर्निर्माण प्रायव्हेट लिमिटेड (SARC) च्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, म्हणजेच **SARC-ट्रस्ट-५ च्या विश्वस्त** म्हणून सुरक्षित धनको, कर्ज मंजुरीचा अभिहस्तांकक आणि असाइनर टूहोम फायनान्स लिमिटेड [पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे] द्वारे वितरित केले आहे, नियम ६,८ आणि ९ सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ नुसार तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे, कर्जदार आणि जामीनदारांकडून SARPL म्हणजेच सुरक्षित कर्जदाराला, पुढील व्याज, शुल्क, खर्च इत्यादींसह थकबाकीची रक्कम वसूल करण्यासाठी खाली नमूद केलेल्या लिलाव वेळापत्रकानुसार **"जसे आहे तिथे आहे", "जसे आहे जे आहे" आणि "जे काही आहे ते"** या आधारावर विकले जाईल. कर्जदार आणि जामीनदारांचे तपशील, देय रक्कम, स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन आणि त्यावर ज्ञात असलेले बोजा, जर असतील तर, राखीव किंमत, बयाणा रक्कम ठेव वाढीव बोली, लिलावाची तारीख आणि तपासणीची तारीख देखील खालीलप्रमाणे दिली आहे:

| कर्ज खाते क्रमांक, ट्रस्ट असाइनरचे नाव आणि नाव / मूळ कर्जदात्याचे नाव | कर्जदार/सहकर्जदार/जमानतदार/ तारण ठेवणाऱ्यांचे नाव | १३(२) मागणीची तारीख आणि रक्कमसूचना | राखीव किंमत (रु. ) आणि वाढीव बोली | लिलावाची तारीख व वेळ | संपर्क व्यक्ती तपशील – (एओ व निवारण समूह ) |
|---|---|---|---|---|---|
| **कर्ज खाते क्रमांक : SHLHAURD0000547 ट्रस्ट खाते क्रमांक : SARC-TRUST-5, टूहोम फायनान्स लिमिटेड यांच्या मार्फत.** | **१. श्री. सय्यद इमरान मलंग पाशा सय्यद २. सौ. रोशनी इमरान सय्यद** | मागणी सूचना दिनांक : ११/०३/२०२४ मागणी सूचना रक्कम :कर्ज खाते क्र SHLHAURD0000547 अंतर्गत दिनांक ०७/०३/२०२४ रोजी देय असलेली रु. ३३,७१,६३७/- (अक्षरी रुपये तेहतीस लाख एकाहत्तर हजार सहाशे सदोतीस फक्त). | रु. १८,८५,४०५/-(अक्षरी रुपये अठरा लाख पंच्याऐंशी हजार चारशे पाच फक्त) **बोली वाढीची रक्कम :** रु. १८,८५४/-(राखीव किमतीच्या १%) | **२० ऑगस्ट, २०२६ लिलावाची वेळ : दुपारी १२.३० ते ०१.३० वाजेपर्यंत** | **श्री. अशफाक पटका मो. क्र. ९८१९४१५४७७ श्री. सुमेश मित्तल मो. क्र. ९९९३५८७७९७ श्री. मयुरेश जाधव मो. क्र. ९८३३०१७२२१ सतीश बनसोड ९७६४३३८८२२ मालमत्ता पाहणी दिनांक : १८/०८/२०२६ वेळ : दु १२.०० ते ३.०० वाजे.** |
| **ताबा दिनांक व ताबा प्रकार** | **ज्ञात अधिभार** | | **बयाणा ठेव रक्कम (ईएमडी ) (रुपयात )** | | |
| **१५ जून, २०२५ आणि भौतिक ताबा** | ज्ञात नाही | | (राखीव किमतीच्या १०%) **ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख : १८ ऑगस्ट, २०२६ वेळ : सकाळी १०.०० ते सायं ०५.०० वाजे.** | | |

**संपत्तीचे विवरण**

छत्रपती संभाजीनगर, ता. व जि. छत्रपती संभाजीनगर येथील गणेश कॉलनी, मजनू हिल, सलीम अली सरोवर रोड येथे असलेल्या "रॉयल अपार्टमेंट" या इमारतीतील तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ७, कार्पेट क्षेत्रफळ ४३.५४ चौ. मीटर (बिल्ट-अप क्षेत्रफळ ५४.५४ चौ. मीटर) असलेली सर्व ती मिळकत. सदर इमारत प्लॉट क्र. ६४, सी.टी.एस. क्र. ११४२४ (भाग), शीट क्र. ३५३, जुना महानगरपालिका क्र. २-६-९२/पी व नवीन महानगरपालिका क्र. २-७-९१/८८ या मालमत्तेवर बांधलेली आहे. चतु:सीमा :पूर्वेस : फ्लॅट क्र. ०६ व जिना पश्चिमेस : मोकळी जागा दक्षिणेस : मोकळी जागा उत्तरेस : मोकळी जागा

| कर्ज खाते क्रमांक, ट्रस्ट असाइनरचे नाव आणि नाव / मूळ कर्जदात्याचे नाव | कर्जदार/सहकर्जदार/जमानतदार/ तारण ठेवणाऱ्यांचे नाव | १३(२) मागणीची तारीख आणि रक्कमसूचना | राखीव किंमत (रु. ) आणि वाढीव बोली | लिलावाची तारीख व वेळ | संपर्क व्यक्ती तपशील – (एओ व निवारण समूह ) |
|---|---|---|---|---|---|
| **कर्ज खाते क्रमांक : SHLHAURD0000667 ट्रस्ट खाते क्रमांक : SARC – TRUST-5, टूहोम फायनान्स लिमिटेड यांच्या मार्फत.** | **१. श्री. गोपाल प्रकाश बसईये २. सौ. रीना गोपाल बसईये ३. श्री. सागर गोपाल बसईये** | मागणी सूचना दिनांक : १०/०२/२०२५ मागणी सूचना रक्कम :कर्ज खाते क्र SHLHAURD0000667 अंतर्गत दिनांक ०७/०२/२०२५ रोजी देय असलेली रु. २५,०९,०७१/- (अक्षरी रुपये पंचवीस लाख नऊ हजार एकाहत्तर फक्त). | राखीव किंमत : रु. १७,३९,७८०/-(अक्षरी रुपये सतरा लाख एकोणचाळीस हजार सातशे ऐंशी फक्त) **बोली वाढीची रक्कम :** रु. १७,३९७/-(राखीव किमतीच्या १%) | **२० ऑगस्ट, २०२६ लिलावाची वेळ : दुपारी १२.३० ते ०१.३० वाजेपर्यंत** | **श्री. अशफाक पटका मो. क्र. ९८१९४१५४७७ श्री. सुमेश मित्तल मो. क्र. ९९९३५८७७९७ श्री. मयुरेश जाधव मो. क्र. ९८३३०१७२२१ सतीश बनसोड ९७६४३३८८२२ मालमत्ता पाहणी दिनांक : १८/०८/२०२६ वेळ : दु १२.०० ते ३.०० वाजे.** |
| **ताबा दिनांक व ताबा प्रकार** | **ज्ञात अधिभार** | | **बयाणा ठेव रक्कम (ईएमडी ) (रुपयात )** | | |
| **१५ जून, २०२५ आणि भौतिक ताबा** | ज्ञात नाही | | (राखीव किमतीच्या १०%) **ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख : १८ ऑगस्ट, २०२६ वेळ : सकाळी १०.०० ते सायं ०५.०० वाजे.** | | |

**संपत्तीचे विवरण**

छत्रपती संभाजीनगर, ता. व जि. छत्रपती संभाजीनगर येथील राजभवन इमारत क्र. ३, शीट क्र. ५२, एम.यू. एन३-१३-३७, सी.टी.एस. क्र. ८५८८, कुंवर फळी, राजा बाजार येथील चौथा मजला, फ्लॅट क्र. १७, क्षेत्रफळ ६८ चौ. मीटर असलेली सर्व ती मिळकत.चतु:सीमा :पूर्वेस : इमारत क्र. ०२पश्चिमेस : फ्लॅट क्र. १६, लिफ्ट व जिनादक्षिणेस : फ्लॅट क्र. १८उत्तरेस : मोकळी जागा

**१. विक्रीच्या सविस्तर अटी व शर्ती, बोली अर्ज (Bid Form) तसेच इतर माहितीसाठी सुरक्षित कर्जदाता/असाइनी/मेसर्स श्रिराम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संकेतस्थळास https://www.shriramarc.com किंवा आमच्या लिलाव संस्थेच्या https://www.bankeauctions.com या संकेतस्थळास भेट द्यावी. अधिक माहितीसाठी किंवा सहाय्यासाठी ऑफिस क्र. १०१, पहिला मजला, बिल्डिंग क्र. ९६, सुवर्णरेखा बुलेवार्ड, घोडके चौक, प्रभात रोड, पुणे – ४११ ००४ येथे संपर्क साधावा किंवा वरील तक्त्यात नमूद केलेल्या संपर्क क्रमांकांवर आमचे व्यावसायिक भागीदार मेसर्स टूहोम फायनान्स लिमिटेड यांच्याशी संपर्क साधावा. सदर अटी व शर्ती बोली अर्जासोबत बोलीदारांनी स्वाक्षरी करून सादर करणे बंधनकारक आहे. सदर सूचना अधिकृत अधिकारी/सुरक्षित कर्जदाता यांच्या अधिकृत संकेतस्थळावरही उपलब्ध आहे.**

**२. इच्छुक बोलीदारांनी इस्ट मनी डिपॉझिट (EMD) ची रक्कम "SARC-TRUST-5" या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारे अथवा RTGS/NEFT द्वारे खालील खात्यात जमा करावी.खात्याचे नाव : SARC-TRUST-5बँकेचे नाव : ICICI Bank Limitedशाखा : Mumbai – Kamani Kurla Westखाते क्रमांक : 196205004628IFSC Code : ICIC0001962**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ मधील नियम ९(१) च्या तरतुदीनुसार वैधानिक १५ दिवसांची विक्री सूचना**

**कर्जदार/तारणदार/जामीनदार यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, वर नमूद केलेली देय रक्कम तसेच त्यावरील अद्ययावत व्याज व अनुषंगिक खर्च ई-लिलावाच्या दिनांकापूर्वी अदा करावा. अन्यथा सदर मालमत्तेचा ई-लिलाव/विक्री करण्यात येईल व उर्वरित थकबाकी असल्यास ती व्याज व खर्चासह वसूल करण्यात येईल.**

ठिकाण - छत्रपती संभाजीनगर.
दिनांक - ०४/०८/२०२६

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी (श्रीराम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड)
( विविध एसएआरपीएल ट्रस्टचे विश्वस्त म्हणून काम करत आहे )